। लातूर । वर्ष ३५ वे । अंक ४८ वा । मंगळवार, दिनांक ०५ मे २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
Email-dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)  कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## लैंगिक शोषण करणाऱ्या नराधमांना पॅरोल देऊ नका: मुख्यमंत्र्यांचे निर्देश




*मुंबई/प्रतिनिधी : पुण्यातील नसरापूर येथे घडलेल्या साडेतीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार आणि हत्या प्रकरणावरून संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणानंतर सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. या प्रकरणानंतर आता महाराष्ट्राच्या आजच्या कॅबिनेट बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. लैंगिक शोषण करणाऱ्या नराधमांना पॅरोल देऊ नका, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.*

मंगळवारी मंत्रालयात कॅबिनेट बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल देऊ नका, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॅबिनेट बैठकीत दिले आहेत. लैंगिक प्रकरणातील आरोपी हे ८० ते ९० टक्के त्याच गुन्ह्यात अटक होऊन पॅरोलवर सुटलेले असतात आणि त्या काळात ते परत तेच गुन्हे करतात. २०१४ ते २०१९ या काळात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना अशा गुन्ह्यातील आरोपींना पॅरोल देऊ नका, असा कायदा केला होता. तो २-३ वर्ष अस्तित्वात होता. पण कालांतराने तो न्यायालयाने रद्द केला. आता पुन्हा तसाच कायदा करा, असे निर्देश देवेंद्र फडणवीसांनी विधी व न्याय विभागाला दिले आहेत.

**नसरापूरमधील प्रकरणावर देवेंद्र फडणवीस काय म्हणाले होते?**

मी स्वत: पीडितेच्या वडिलांशी दोनवेळा बोललो. मी त्यांना हे समजावून सांगितले, आपल्याला नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा करुन घ्यायची आहे. त्यासाठी वेळेत चार्जशीट दाखल होणे आणि केस चालणे, माननीय हायकोर्टाच्या माध्यमातून सगळ्या गोष्टीला फास्ट ट्रॅकवर नेत आहोत. लोकशाहीत आपल्या सगळ्यांना वाटतं, अशा नराधमाला भरचौकात फाशी दिली पाहिजे. पण ते लोकशाहीत करता येत नाही. लोकशाही कायद्याने चालते. पण कोणालाही कायद्याचा दुरुपयोग करता येऊ नये, यादृष्टीने कोणताही कोणतीही पळवाट न ठेवता या नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा कशी होईल, याचा प्रयत्न राज्य सरकार करेल. न्यायालयातून हे प्रकरण वेगाने मार्गी लावले जाईल. तसे पत्र आम्ही पीडीतेच्या कुटुंबाला दिले आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते.

**पुण्यातील नसरापूरमधील नेमकं प्रकरण काय?**

सुट्टीसाठी आजीच्या घरी आलेली ४ वर्षांची चिमुकली अंगणात खेळत होती. त्यावेळी १ मे रोजी ६५ वर्षांच्या आरोपीने तिला गोठ्यात नेलं. तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. एवढंच नाहीतर तिला दगडाने ठेचून तिची हत्या केली. त्यानंतर तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली झाकून ठेऊन पळ काढला. इतकं गंभीर कृत्य करूनही या नराधमाला त्याचा जराही पश्चाताप झालेला नाही. ग्रामस्थांनी त्याला चोप देऊन पोलिसांच्या ताब्यात दिलं.

## प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेतून युवकांसाठी कौशल्य विकासाची संधी

**लातूर/प्रतिनिधी :** भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना अंतर्गत प्रायोगिक प्रकल्पाच्या विस्तारासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केली आहेत. अर्थसंकल्प २०२४-२५ मध्ये घोषित केलेल्या या योजनेचा मुख्य उद्देश देशातील तरुणांना भारतातील अव्वल कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळवून देणे हा आहे. या प्रायोगिक प्रकल्पांतर्गत १ लाख १० हजार इंटर्नशिप संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून हा प्रकल्प डिसेंबर २०२६ पर्यंत वाढवण्यात आला आहे.

इंटर्नशिपचा कालावधी हा संबंधित क्षेत्राच्या आणि कंपनीच्या गरजेनुसार ६ ते ९ महिने इतका असेल. यातील किमान अर्धा कालावधी हा प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी (ऑन-जॉब) व्यतीत करणे अनिवार्य आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराचे वय १८ ते २५ वर्षे दरम्यान असावे. हायस्कूल, उच्च माध्यमिक उत्तीर्ण, आयटीआय प्रमाणपत्रधारक, पॉलिटेक्निक डिप्लोमा धारक किंवा पदवीधर बी.ए., बीएस.सी., बीकॉम, बीसीए, बी. फार्मा, बी.ई., बी. टेक. इत्यादी आणि पदव्युत्तर पदवी शैक्षणिक पात्रता असलेले उमेदवार पात्र आहेत. उमेदवार पूर्णवेळ नोकरीत नसावा किंवा पूर्णवेळ शिक्षण घेत नसावा.

आयआयटी, आयआयएम, आयआयएसईआर, एनआयडी सारख्या नामांकित संस्थांमधील पदवीधर, तसेच सीए, सीएस,एमबीबीएस, एमबीए, पीएचडीधारक या योजनेसाठी पात्र नाहीत. तसेच, ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १२ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे किंवा ज्यांच्या कुटुंबातील सदस्य कायमस्वरूपी सरकारी कर्मचारी आहेत, ते या योजनेचा लाभ घेऊ शकत नाहीत.

ही योजना थेट लाभ हस्तांतरण डीबीटी तत्त्वावर आधारित असून उमेदवारांना दरमहा ९ हजार रुपये मानधन दिले जाईल. यामध्ये कंपनीचा वाटा ९०० रुपये असेल, तर सरकार ८ हजार १०० रुपये थेट उमेदवाराच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करेल. इंटर्नशिप सुरू केल्यावर आणि ठराविक कालावधी पूर्ण झाल्यावर दोन टप्प्यांत एकूण ६ हजार रुपये रुपयांचे एकरकमी अनुदान दिले जाईल. प्रत्येक उमेदवाराला प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अंतर्गत जीवन आणि अपघाती विमा कवच दिले जाईल.

इच्छुक उमेदवारांना मंत्रालयाच्या अधिकृत पोर्टल www.pminternship.mca.gov.in वर जाऊन आपली नोंदणी करावी लागेल. या पोर्टलवर उमेदवारांना त्यांच्या पसंतीचे क्षेत्र, स्थान आणि कंपनी निवडण्याची सुविधा उपलब्ध असेल. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय या योजनेसाठी नोडल एजन्सी म्हणून काम पाहत असून, उद्योगांच्या सहभागातून या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. तरुणांना उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य प्राप्त करून देऊन त्यांची रोजगारक्षमता वाढवणे, हा या योजनेचा मूळ हेतू आहे.

## IIIT नागपूरमध्ये कोल्हापूरच्या विद्यार्थ्याने आयुष्य संपवले

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूरमधून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. नागपूरच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी' मधील एका द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्याने परीक्षेच्या तणावातून इमारतीवरून उडी मारून आपली जीवनयात्रा संपवली. श्रेयस माने असे या दुर्दैवी विद्यार्थ्याचे नाव असून, या घटनेमुळे संपूर्ण शैक्षणिक वर्तुळात खळबळ उडाली आहे.

**काय आहे नेमकी घटना?**

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, श्रेयस हा मूळचा कोल्हापूरचा रहिवासी असून तो कॉम्प्युटर सायन्स स्पेशलायझेशनच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत होता. सोमवारपासून त्याची चौथ्या सत्राची परीक्षा सुरू होणार होती. मात्र, परीक्षेच्या काही तास आधी, सोमवारी पहाटे श्रेयसने वसतिगृहाच्या इमारतीच्या नवव्या मजल्यावरून उडी मारून आपलं जीवन संपवलं.

**परीक्षेचा दबाव कारणीभूत?**

श्रेयसच्या मित्रांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रेयसचे पहिल्या वर्षाचे काही विषय 'बॅक' राहिले होते. तसेच दुसऱ्या वर्षातही त्याने काही पेपर दिले नव्हते.र यामुळे तो मानसिक तणावात असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सोमवारची परीक्षा सुरू होण्यापूर्वीच त्याने हे पाऊल उचलल्याने शैक्षणिक तणावाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## निवडणूक संपताच सैन्याकडून बंगालच्या उपसागरात NOTAM जारी

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताने बंगालच्या उपसागरात एक मोठा 'नोटीस टू एअरमेन' (NOTAM) जारी केला असून, सुमारे ३,५५० किलोमीटरचा परिसर 'डेंजर झोन' म्हणून घोषित केला आहे. संरक्षण सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारत आपली शक्तीशाली इंटरमीडिएट रेंज बॅलिस्टिक मिसाइल 'अग्नी-खत' च्या चाचणीची तयारी करत आहे. या चाचणीसाठी निवडण्यात आलेली वेळ अतिशय महत्त्वाची मानली जात असून, हा एक मोठा आंतरराष्ट्रीय संदेश असल्याचे बोलले जात आहे.

२०२६ या कालावधीत होऊ शकते. विशेष म्हणजे, मे २०२५ मध्ये भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत मोठे हल्ले केले होते. या धाडसी कारवाईला एक वर्ष पूर्ण होत असतानाच भारत ही क्षेपणास्त्र चाचणी करत आहे. सहा मे रोजीच ही चाचणी होण्याची शक्यता आहे.

**अग्नी-IV: भारताचे अजेय अस्त्र**

पल्ला: ३,५०० ते ४,००० किलोमीटरपर्यंत अचूक मारा करण्याची क्षमता.

क्षमता: १० हजार किलोपर्यंतचे अण्वस्त्र वाहून नेण्यास सक्षम.

अचूकता: आधुनिक एव्हिऑनिक्समुळे याची 'सर्कुलर एरर' १०० मीटरपेक्षाही कमी आहे, म्हणजेच हे क्षेपणास्त्र अत्यंत अचूक आहे.

बनावट: संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (DRDO) विकसित केलेले हे दोन टप्प्यांचे, घन इंधनावर आधारित क्षेपणास्त्र आहे.



तैनाती: हे क्षेपणास्त्र रस्त्यावरूनही कुठेही नेऊन डागता येते, ज्यामुळे युद्धकाळात याची उपयुक्तता वाढते.

**NOTAM म्हणजे काय?**

'नोटीस टू एअरमेन' तेव्हा जारी केला जातो जेव्हा एखाद्या विशिष्ट हवाई क्षेत्रातील नागरी विमानांची वाहतूक थांबवायची असते. क्षेपणास्त्र चाचणी किंवा युद्धाभ्यास करताना सुरक्षा उपाय म्हणून हे क्षेत्र बंद केले जाते. सध्या भारत आणि पाकिस्तान दोघांनीही गेल्या एक वर्षापासून एकमेकांसाठी हवाई क्षेत्र मर्यादित केले आहे.

**संरक्षण सज्जतेचा नवा टप्पा**

भारत केवळ अग्नी-खत नव्हे, तर ८०० किमी पल्ल्याच्या ब्रह्मोस क्रूझ मिसाइल आणि हायपरसोनिक क्षेपणास्त्रांवरही काम करत आहे. या चाचण्या भारताच्या 'किमान विश्वसनीय प्रतिबंधक' धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहेत.

### प्रभात किरणे

बैलाचा घाणा झाला रे बंद
मानव मना लागला तोच छंद
भौतिक सुखात, सुखाचा चुराडा
जीवन म्हणजे कोंबड्याचा खुराडा
- इंजि. नागनाथ कलवले, लातूर
मो. ९७६४७ ८८२८८

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



महिला आयोगाच्या अध्यक्षपदी मीरा बोरवणकर यांची निवड निश्चित...

### चिमटा दयाचा



उष्णतेत वाढ झाली आहे !
पाण्याची समस्या
वाढली आहे !!
पाणीसाठा असून दहा दिवस
झाले तरी पाण्याचा
ठण-ठणात आहे!!!

## भांबरी शिवारात जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई



### २.१७ लाखांचा मुद्देमाल जप्त; ५ जण ताब्यात

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा पोलीस दलाने अवैध धंद्यांविरोधात सुरू ठेवलेल्या कठोर मोहिम अंतर्गत दिनांक ३ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील भांबरी शिवारात धाड टाकत तिर्रट नावाच्या जुगार अड्ड्यावर कारवाई करत पाच जणांना रंगेहात पकडले असून, तब्बल २,१७,०६०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक ०३ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे १७:१० वाजण्याच्या सुमारास, पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशान्वये व अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ यांच्या नेतृत्वातील पथकाने भांबरी शिवारातील एका शेतात नारळाच्या झाडाखाली बेकायदेशीर जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाले वरून माहितीची शहानिशा करून सायं. १७:४० वाजता संबंधित ठिकाणी धाड टाकण्यात आली. छाप्यात पाच इसम गोलाकार बसून तिर्रट नावाचा जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी त्वरित सर्वांना ताब्यात घेत पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्यांच्या ताब्यातून रोख रक्कम, मोबाईल हँडसेट, जुगाराचे साहित्य, मोबाईल, वाहन असा एकूण २,१७,०६०/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून या कारवाईत शाबाज (रा. वसवाडी पाखरसांगवी, लातूर) इंजमाम (रा. जाफर नगर, लातूर) सागर (रा. खाडगाव रोड, लातूर) अविनाश (रा. पटेल नगर, लातूर) आसिफ (रा. खाडगाव रोड, लातूर) वरील सर्व गुन्हेगार हे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीररीत्या तिर्रट जुगार खेळत व खेळवत असल्याचे निष्पन्न झाले असून, त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) अन्वये पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली पथकामधील पोउपनि अमर केंद्रे, पोलीस अंमलदार, साहेबराव हाके,अर्जुनसिंग राजपूत, रियाज सौदागर, मनोज खोसे, आनंद हल्लाळे, प्रविण कोळसुरे यांनी केले आहे.

लातूर जिल्ह्यातील कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे, जुगार, सट्टा, मटका यांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही. अशा कारवाया भविष्यातही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असून, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## गुन्हेगारी वृत्तीत वाढ होत आहे

राज्यात दिवसेंन दिवस गुन्हेगारी वृत्ती वाढत आहे ही एक चिंताजनक बाब आहे. पुर्वी व आता गुन्हेगारी का वाढत आहे या बाबत चिंतन होत नाही. चिंतन तर नाहीच त्यापेक्षा यावर निर्बंध आणण्यासाठी ठोस उपायोजनाची गरज आहे तीही दिसून येत नाही. मुळात गुन्हेगारी क्षेत्रातील काहींना ओळखण्यात कमी पडत आहोत. राज्यातील घटनेचा विचार केला तर मतीगुंग झाल्याशिवाय राहात नाही. महिलांवरील अत्त्याचाराच्या घटनेत वाढ झालेली आहे. दर ५३ मिनिटाला महिलावर अत्त्यावर होत आहे. नाशिक येतील घटना असो किंवा पुण्यातील म्हणजे नसरापूरातील घटना ह्या महिलांवरील अत्त्याचाराच्या आहेत. ठराविक वाईट बाब उघडवित आहेत. असे असताना सावध होत नाहीत. नाशिक मधील घटना तशी भयाण आहे. विचार केला तर मोठी भयाण आहे. अत्त्याचार प्लस धर्मांतर! विचार नाही केला तर काय होईल हे सांगण्याची गरज नाही. एक बाब लक्षात ठेवावी की, वाईट घटनेस वेळीच पायबंद घातला पाहिजे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था मजबुत असली पाहिजे. सर्व काम सरकार करेल या भरोशावर न राहाता आपआपली नागरिक म्हणून जबाबदारी ओळखण्याची गरज आहे. पोलिस यंत्रणा किंवा सरकार बारीकसारीक बाबीकडे लक्ष ठेवणे अशक्य आहे. नाशिकमध्ये एक दोन महिण्यापासून गैरकृत्य चालू होत असे नाही तर अनेक वर्षापासून चालू असणार! त्याच प्रमाणे गुन्हेगाराच्या विरोधात जाणे कोणी धजत नाही. मुळात संरक्षण मिळेलच याचा भरोसा नाही. पुर्वी एक विश्वास होता तो आता दिसून येत नाही. पुर्वी साध्या पोष्टकार्डावर तक्रार केली किंवा माहिती कळवली तर चौकशी होत होती. आता चौकशीच होत नाही. जो तक्रारकर्ता आहे त्याच्या निर्बंध व दबाव आणला जातो. या बाबत सिद्ध करा म्हटले तर मोठे आवघड काम आहे. काही बाब सिद्ध करता येत नाहीत. ही वस्तूस्थिती आहे. सरकार व प्रशासन सतर्क असले पाहिजे. सरकारने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. राज्यात अप्रिय घटना चांगल्या माणसापासून होत नाहीत तर ठराविकाकडून होताना दिसून येत आहेत. काही भाग संवेदनशील आहे. काही व्यक्ती संवेदनशील आहेत. अशा संवेदनशीलकडे दुर्लक्ष होत असेल तर राज्यात काय दुसरे काय घडणार? राज्यात अतिषय निंदणीय प्रकार होत आहेत. बीडची घटना असो किंवा अन्य ठिकाणावरील घटना भयाण आहे. धर्मांतराच्या घटनेकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. मुली गायब होण्याच्या घटनेत वाढ होत आहे. गायब झालेल्या मुली, महिला गेल्या कोठे? याचा तपास तपास यंत्रणा लावणार का अन्य? तसे पाहिले तर महिला-मुली गायब होणे ही मोठी लाजीरवाणी बाब आहे. धर्मांतराच्या घटना घडणे सर्वात मोठी लाजीरवाणी बाब आहे. दबाब आणून घटना घडविल्या जात असेल व मोठी कारवाई होत नसेल तर अशा घटना कमी होणार नाहीत. मुळात घटना घडल्यावर गुन्हा करणाऱ्यावर मोठी कारवाई आपल्या राज्यात होत नाही. इतर राज्यात जशी धाडसी कारवाई होते तशी धाडसी कारवाईची गरज आहे. गुन्हा करणाऱ्याचा धरकाप उडला पाहिजे. हात कापायला लागला पाहिजे. वास्तविक एक प्रकारे विटंबना होत आहे. अजूनही वेळी गेलेली नाही, वेळीच जर सावध झाले तर आळा बसू शकतो. लहानमुलीवर, वयस्कावर अत्त्याचार केला काय करीत आहे तर कोर्ट कचेरीत अर्धे आयुष्य सरकारी मेहमान म्हणत जेलमध्येच राहातो आहे. गुन्हा गेला शिक्षा जबर होवू शकते अशी भिती निर्माण होणे अपेक्षित आहे. तीन वर्षाच्यामुलीवर अत्त्याचार करून हत्त्या केली जाते किती भयाण बाब आहे. गुन्हेगारी पार्श्वभुमी असणाऱ्याकडून असे कृत्य पुण्यासारख्या उच्च ज्ञानीक्षेत्रात घडते. हे योग्य नाही. पुणे भागातील ही पहिलीच घटना आहे असे नाही यापुर्वीही घटना घडल्या आहे. खुनाच्या असो किंवा मुलीवरील अत्त्याचाराच्या घटना असोत. कठोर भुमिका निभावली का? या बाबत विचार केला पाहिजे. तो केला जात नाही. घटना घडत आहेत, दुसऱ्यांदा झाली की, पहिली विसरली जात आहे. विसरणे हा स्वभाव बनत आहे. तेवढ्यापुरते वातावरण गरम दिसून येत आहे. कोणतीही कायमस्वरूपी नियोजन केले जात नाही असेच चित्र दिसून येत आहे. अप्रिय घटना घडल्यावर कोणती भक्कम भुमिका नागरिक हाती घेत नाहीत. वाईटकृत्य करणाऱ्या परिवारावर बहिष्कार घातला का? त्याच्याकडील वस्तू घेणे टाळले का? मुळीच असे दिसून आले नाही व येणारही नाही. संवेदना संपल्या आहेत. आपल्या पुर्वजांनी ज्या त्यागातून स्वराज्य मिळवुन दिले त्याची किंमत स्वराज्या ऐषआरामात राहाणाऱ्यांना कळणार नाही. महाराष्ट्रावर मराठवाडासह दोन परकिंय सत्ता होत्या एक ब्रिटीश व निजामाशाही. या दोघांनी काय केले तर प्रेम नाही केले. मग काय केले हे सर्वांना माहिती आहे. त्याग, बलिदान व शौर्याने वागलेल्यांचे वंशज असताना घाबरून आपल्याला काय करायाचे हा विचार मनात घर करून आहे. आज शेजारी परिवारातील महिलांना हिंदु धर्म सोडायाला भाग पाडले जात असेल तर आपल्याला काय करावयाचे म्हणून गप्प राहाणारे सुद्ध गुन्हेगार ठरतात? शेजारी परिवारातील बालिकेवर अत्त्याचार झाला आपल्याला काय करायाचे! जो नराधम कोण असेल. कोणाचेतरी नातेसंबंध, कुटुंबातील असेल. सध्याला काय झाले, आपल्याला काय करायाचे हाच प्रश्न मनात घर करून राहीला आहे हे योग्य नाही, घातक आहे. स्वसंरक्षार्थ कोणतीही उपयोजना नाही. उदा. घ्यायचे झाले तर रात्रीच्यावेळी घरात चोर आले किंवा शिरले काय करणार? त्याच्याशी दोन होत करण्याची हिंमत नाही कारण कोणाशीही आता पर्यंत दोन होत केलेले नसते. दुसरे काठी तरी घरात सापडत नाही. साप निघाला तर काठी सापडत नाही अशी स्थिती दिसून येते. सध्याला स्वसंरक्षणाची मोठी गरज आहे. स्वत:चे संरक्षण करण्याऐवढी ताकद निर्माण करा. आपल्या मुला-मुलीस स्वरंक्षणाचे धडे द्या. नसता कोणीही येईल व टिकली मारून जाईल. अशी स्थिती निर्माण होवू नये. आपण आपल्या पुर्वजांचे नांवे मोठमोठ्यांनी घेत असतो. जय-जयकार करतो, आपण त्यांच्या अंगी असणारा एकतरी धाडसी गुण घेत नाहीत हे योग्य नाही. पुतळे पाहातो, त्यांचे स्मरण करून कोणती प्रेरणा घेतो तर याचे उत्तर नाही असेच दिसून येते. त्यामुळे परिस्थिती पाहूल बदल घडवा. राज्यात अनेक अप्रिय घटना घडत आहे किंवा घडवत आहे. त्यापासून कसे सावध राहाता येईल याचा विचार करा. स्वसंरक्षित कसे होता येईल याचा मुला-मुलींनी विचार जरूर करा.

# राजर्षी शाहू महाराजांचे परिवर्तनवादी कार्य



भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर ते पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच महान, दूरदर्शी आणि समाजपरिवर्तनाला आयुष्य अर्पण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ६ मे हा त्यांचा स्मृतिदिन केवळ एक औपचारिक स्मरणदिन नसून, तो सामाजिक समतेच्या, न्यायाच्या आणि मानवतेच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून समाजातील विषमता, अन्याय आणि जातीय भेदभाव यांना ज्या पद्धतीने आव्हान दिले, ते भारतीय सामाजिक इतिहासातील एक क्रांतिकारी पर्व ठरले. त्यांच्या कार्यामुळे समाजातील वंचित, दलित, मागासवर्गीय आणि स्त्रिया यांना केवळ संधीच मिळाली नाही, तर सन्मानाने जगण्याचा अधिकारही प्राप्त झाला. म्हणूनच शाहू महाराजांचे कार्य हे केवळ ऐतिहासिक नोंद नाही, तर ते आजच्या आधुनिक भारताच्या सामाजिक रचनेचा एक भक्कम पाया आहे.

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव घाटगे असे होते. लहानपणापासूनच त्यांच्यावर सामाजिक जाणिवांचा प्रभाव होता. त्यांनी समाजातील विषमता आणि अन्याय जवळून अनुभवला होता. पुढे कोल्हापूर संस्थानाच्या गादीवर आरूढ झाल्यानंतर त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केवळ प्रशासनासाठी न करता, समाजपरिवर्तनासाठी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या दृष्टीने राज्यकारभार म्हणजे केवळ सत्ता नव्हती, तर ती एक सामाजिक जबाबदारी होती.

शाहू महाराजांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे प्रमुख साधन मानले. त्या काळात शिक्षण ही केवळ उच्चवर्गीयांची मक्तेदारी होती. बहुसंख्य समाज शिक्षणापासून वंचित होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. त्यांनी दलित, मागासवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभारली, शिष्यवृत्ती दिल्या आणि शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. शिक्षणामुळेच व्यक्ती सक्षम होते आणि समाज बदलतो, या विश्वासातून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला.

शाहू महाराजांच्या कार्याचा सर्वात महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू म्हणजे त्यांनी कोल्हापूर संस्थानात १९०२ साली लागू केलेले आरक्षण धोरण होय. त्यांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण जाहीर केले. हा निर्णय त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला मोठे आव्हान देणारा होता. आरक्षणाच्या माध्यमातून त्यांनी वंचित घटकांना सत्तेच्या आणि प्रशासनाच्या केंद्रस्थानी स्थान मिळवून दिले. हा निर्णय केवळ धोरणात्मक नव्हता, तर तो सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा प्रत्यक्ष अंमल होता.

जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता ही भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी मोठी अडचण असल्याचे शाहू महाराजांना जाणवले. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यांनी सार्वजनिक विहिरी, तलाव, रस्ते आणि मंदिरे सर्वांसाठी खुले केले. त्यांच्या या निर्णयामुळे समाजातील भेदभाव कमी होण्यास मदत झाली आणि सामाजिक एकात्मतेची भावना वाढीस लागली.

स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शाहू महाराजांनी केलेले कार्यही अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले, विधवा पुनर्विवाहाला मान्यता दिली आणि स्त्रियांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांच्या मते, समाजाचा विकास हा स्त्रियांच्या सक्षमीकरणाशिवाय शक्य नाही. त्यामुळे त्यांनी स्त्रियांना समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला.

आर्थिक क्षेत्रातही शाहू महाराजांनी अनेक सुधारणा केल्या. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी धोरणे राबवली, सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली. त्यांनी शेतकऱ्यांना कर्जसवलती, सिंचन सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील आर्थिक स्थिती सुधारली.

शाहू महाराजांच्या कार्यात धर्मनिरपेक्षतेचा स्पष्ट प्रभाव दिसतो. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने मानवता हीच सर्वोच्च मूल्य होती. त्यांनी कोणत्याही धर्माच्या किंवा जातीच्या आधारावर भेदभाव केला नाही.

त्यांच्या कार्याचा प्रभाव पुढील अनेक समाजसुधारकांवर पडला आणि भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना त्यांनी अप्रत्यक्ष प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे समाजातील वंचित घटकांना आत्मविश्वास मिळाला आणि त्यांनी प्रगतीचा मार्ग धरला.

आजच्या काळात शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. अजूनही समाजात विषमता, भेदभाव आणि अन्याय अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक न्यायासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते.

राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना त्यांच्या सामाजिक दृष्टिकोनाची व्यापकता आणि दूरदृष्टी लक्षात घेतली पाहिजे. त्यांनी समाजातील असमानतेकडे केवळ दयाभावाने पाहिले नाही, तर ती एक संरचनात्मक समस्या आहे, जी राज्यव्यवस्थेच्या सक्रिय हस्तक्षेपाशिवाय दूर होऊ शकत नाही, असे त्यांनी स्पष्टपणे ओळखले. म्हणूनच त्यांनी आपल्या कारभारात केवळ सुधारणा न करता, एक प्रकारे सामाजिक क्रांतीच घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळणे हेच खरे लोकशाहीचे तत्त्व होते.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यात प्रशासनाच्या प्रत्येक स्तरावर सामाजिक प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी केवळ आरक्षण लागू केले नाही, तर त्याची काटेकोर अंमलबजावणीही केली. त्यांनी मागासवर्गीयांना नोकऱ्यांमध्ये स्थान देताना त्यांच्या प्रशिक्षणाची, कौशल्यविकासाची आणि आत्मविश्वास वाढवण्याचीही काळजी घेतली. त्यांच्या मते, संधी देणे हे पहिले पाऊल आहे, परंतु त्या संधीचा उपयोग करण्यासाठी आवश्यक साधने आणि वातावरण उपलब्ध करून देणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे, त्यांनी समाजातील उच्चवर्गीयांच्या वर्चस्वाला थेट आव्हान दिले. त्या काळात ब्राह्मणवर्गाचे प्रशासन, शिक्षण आणि धार्मिक क्षेत्रांवर मोठे वर्चस्व होते. शाहू महाराजांनी या वर्चस्ववादी रचनेला धक्का देण्यासाठी ब्राह्मणेतर चळवळीला पाठिंबा दिला. त्यांनी समाजातील इतर घटकांना सशक्त करून एक समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यामुळे समाजात एक नवीन सामाजिक जागृती निर्माण झाली.

शाहू महाराजांचे कार्य केवळ सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी लोककलांना प्रोत्साहन दिले, कलाकारांना संरक्षण दिले आणि समाजातील सांस्कृतिक विविधतेचा सन्मान केला. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर हे एक सांस्कृतिक केंद्र म्हणून विकसित झाले. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीला वाव दिला, ज्यामुळे समाजात आत्मसन्मानाची भावना वाढीस लागली.

शाहू महाराजांनी पत्रकारिता आणि प्रसारमाध्यमांचा उपयोगही समाजजागृतीसाठी केला. त्यांनी विविध वृत्तपत्रांना प्रोत्साहन दिले आणि सामाजिक प्रश्नांवर खुल्या चर्चेला चालना दिली. त्यांच्या मते, समाजातील बदलासाठी विचारांची देवाणघेवाण आणि संवाद अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी लोकशाही मूल्यांचा पुरस्कार केला आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला पाठिंबा दिला.

धर्माच्या बाबतीतही शाहू महाराजांची भूमिका अत्यंत प्रगत होती. त्यांनी धर्माला वैयक्तिक श्रद्धेचा विषय मानले आणि राज्यकारभारात धर्मनिरपेक्षतेचा अवलंब केला. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील ऐक्य आणि बंधुता टिकवण्यासाठी धर्मनिरपेक्षता अत्यंत आवश्यक होती.

शाहू महाराजांच्या कार्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी सामाजिक न्यायाच्या लढ्याला मानवी मूल्यांशी जोडले. त्यांनी केवळ धोरणे राबवली नाहीत, तर समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना समतेचे, बंधुत्वाचे आणि सहिष्णुतेचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून आला.

आजच्या काळात 'मेरिट' या संकल्पनेवरही मोठ्या प्रमाणावर चर्चा होते. काहीजण असा युक्तिवाद करतात की, आरक्षणामुळे गुणवत्ता कमी होते. परंतु शाहू महाराजांनी स्पष्टपणे दाखवून दिले की, गुणवत्ता ही केवळ जन्मावर अवलंबून नसून, ती संधी आणि संसाधनांवर अवलंबून असते. जेव्हा समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळतील, तेव्हाच खरी गुणवत्ता विकसित होऊ शकते. शाहू महाराजांच्या कार्यातून आपल्याला हे शिकायला मिळते की, समाजातील परिवर्तनासाठी केवळ कायदे आणि धोरणे पुरेशी नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते. त्यांनी आपल्या कार्यातून समाजात जागृती निर्माण केली आणि समतेच्या मूल्यांचा प्रसार केला.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात सामाजिक न्यायाचे स्वरूप बदलत आहे. नवीन प्रकारच्या विषमता निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला समतेचा आणि न्यायाचा संदेश आजही तितकाच लागू आहे. राजर्षी शाहू महाराजांचा स्मृतिदिन हा त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा दिवस असला, तरी तो आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवसही आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण समाजातील विषमता दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा सखोल अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते की, त्यांनी ज्या प्रकारे सामाजिक न्याय, समता आणि मानवतेच्या मूल्यांना आपल्या कारभाराच्या केंद्रस्थानी ठेवले, ते आजच्या आधुनिक लोकशाही व्यवस्थेसाठीही अत्यंत मार्गदर्शक आहे. राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य केवळ एका संस्थानापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा प्रभाव संपूर्ण भारतीय समाजव्यवस्थेवर पडला. त्यांनी समाजातील विषमता दूर करण्यासाठी जे उपाययोजना केल्या, त्या आजही सामाजिक धोरणांच्या मुळाशी आढळतात.

आजच्या भारतात संविधानिक पातळीवर समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये मान्य केली गेली आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची व्यवस्था केली गेली आहे. स्त्रियांसाठी विविध सक्षमीकरणाच्या योजना राबवल्या जात आहेत. शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या सर्व प्रक्रियांमध्ये शाहू महाराजांच्या विचारांची छाप स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी मांडलेली 'समान संधी' ही संकल्पना आजच्या धोरणांचा पाया बनली आहे.

तथापि, आजच्या काळात सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीत अनेक आव्हानेही आहेत. आरक्षण धोरणांवर राजकीय हस्तक्षेप वाढला आहे, काही ठिकाणी त्याचा गैरवापरही होत असल्याची टीका केली जाते. 'क्रीमी लेयर', आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, खाजगी क्षेत्रातील आरक्षण यांसारखे अनेक नवीन प्रश्न उद्भवले आहेत. या सर्व प्रश्नांचा विचार करताना शाहू महाराजांच्या मूलभूत तत्त्वांची आठवण ठेवणे आवश्यक आहे. आरक्षण ही केवळ सवलत नसून, ती ऐतिहासिक अन्याय दुरुस्त करण्याची प्रक्रिया आहे.

आजच्या समाजात 'मेरिट' या संकल्पनेभोवतीही मोठा वाद आहे. काहीजण आरक्षणाला गुणवत्ता कमी करणारे मानतात, तर काहीजण ते सामाजिक समतेसाठी आवश्यक मानतात. या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, संधी मिळाल्याशिवाय कोणतीही गुणवत्ता विकसित होऊ शकत नाही. त्यामुळे आरक्षण आणि मेरिट हे परस्परविरोधी नसून, आरक्षणामुळेच खऱ्या अर्थाने गुणवत्ता विकसित होऊ शकते.

जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक आणि सामाजिक विषमता नव्या स्वरूपात पुढे येत आहेत. तंत्रज्ञानामुळे काही नवीन संधी निर्माण झाल्या असल्या, तरी डिजिटल दरी, शैक्षणिक असमानता आणि रोजगाराच्या संधींमधील विषमता यांसारख्या समस्या वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. त्यांनी दिलेला समतेचा संदेश आजच्या बदलत्या काळातही मार्गदर्शक आहे.

शाहू महाराजांनी समाजपरिवर्तनासाठी केवळ धोरणात्मक बदल केले नाहीत, तर त्यांनी समाजाच्या मानसिकतेतही परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांमध्ये समतेची, बंधुत्वाची आणि सहिष्णुतेची भावना निर्माण केली. आजच्या काळातही सामाजिक न्यायाची खरी अंमलबजावणी करण्यासाठी समाजातील मानसिकतेत बदल होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी प्रशासनाला लोकाभिमुख बनवले. त्यांनी सत्तेचा वापर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केला. आजच्या काळातही प्रशासन अधिक संवेदनशील, पारदर्शक आणि लोककेंद्रित बनवण्याची गरज आहे. या संदर्भात शाहू महाराजांचे कार्य प्रेरणादायी ठरते.

राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिदिनानिमित्त आपण केवळ त्यांना श्रद्धांजली अर्पण करून थांबू नये, तर त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजातील विषमता, अन्याय आणि भेदभाव दूर करण्यासाठी सक्रिय भूमिका घेतली पाहिजे. सामाजिक न्याय ही केवळ सरकारची जबाबदारी नसून, ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले.

आजच्या भारतात समताधिष्ठित, न्याय्य आणि सशक्त समाज निर्माण करण्यासाठी शाहू महाराजांचे विचार अत्यंत उपयुक्त आहेत. शिक्षण, आरक्षण, स्त्रीसक्षमीकरण, आर्थिक विकास आणि सामाजिक ऐक्य या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास समाज अधिक प्रगत आणि समतावादी बनू शकतो. समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, हीच खरी लोकशाही आहे. शाहू महाराजांनी आपल्या कार्यातून हीच संकल्पना प्रत्यक्षात उतरवली. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक परिवर्तनासाठी धाडस, दूरदृष्टी आणि प्रामाणिकपणा आवश्यक असतो. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन आपणही समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

शेवटी, राजर्षी शाहू महाराजांचे जीवनकार्य हे भारतीय समाजाच्या इतिहासातील एक उज्ज्वल पर्व आहे. त्यांनी समतेचा दीप प्रज्वलित केला, सामाजिक न्यायाचा मार्ग दाखवला आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचा संकल्प करूया. त्यांच्या आदर्शांचा अवलंब करून आपण एक समताधिष्ठित, न्याय्य आणि सशक्त भारत निर्माण करू शकतो हीच त्यांना खरी आणि अर्थपूर्ण श्रद्धांजली ठरेल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
**लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत**

## उन्हातून आल्यानंतर थंड पाण्याने स्नान करताय?



भर उन्हातून घराबाहेरून आल्यानंतर लगेच थंड पाण्याने स्नान करणे ही अनेकांसाठी अत्यंत सुखावह गोष्ट असते; मात्र ही सवय आरोग्यासाठी घातक ठरू शकते.

बाहेरच्या प्रखर उष्णतेतून आल्यावर शरीराचे तापमान खूप वाढलेले असते. अशा स्थितीत लगेच थंड पाणी अंगावर घेतल्यास शरीराला एक प्रकारचा 'टेंपरेचर शॉक' म्हणजेच तापमानाचा तीव्र धक्का बसतो. उन्हाळ्यात उष्माघातापासून वाचण्यासाठी जशी खबरदारी घ्यावी लागते, तशीच खबरदारी घरी आल्यानंतरच्या पहिल्या अर्ध्या तासात घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

आपण प्रखर उन्हात असतो, तेव्हा आपले शरीर स्वतःला थंड ठेवण्यासाठी रक्तवाहिन्यांचे रुंदीकरण करते. या प्रक्रियेमुळे शरीरातील उष्णता बाहेर टाकली जाते आणि हृदयाचे ठोके वाढतात. तसेच, घामावाटे शरीर तापमान नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत असते. अशावेळी अचानक थंड पाण्याचा संपर्क आल्यास शरीरातील पृष्ठभागावरील रक्तवाहिन्यांचे वेगाने आकुंचन होते. याला वैद्यकीय भाषेत 'व्हासोकॉन्स्ट्रिक्शन' असे म्हणतात. यामुळे रक्ताभिसरणात अडथळा निर्माण होऊन रक्तदाब अचानक वाढू शकतो. ही परिस्थिती हृदयावर अतिरिक्त ताण निर्माण करते.यामुळे चक्कर येणे किंवा शुद्ध हरपण्यासारखे प्रकार घडू शकतात.

**विशेषतः** वृद्ध व्यक्ती, लहान मुले आणि ज्यांना हृदयाचे विकार किंवा रक्तदाबाचा त्रास आहे, अशा लोकांसाठी ही सवय जीवघेणी ठरू शकते. अचानक होणार्या या बदलामुळे मज्जासंस्थेवर ताण येतो आणि शरीराची नैसर्गिक तापमान नियंत्रण प्रणाली कोलमडू शकते. तज्ज्ञांच्या मते, बाहेरून आल्यावर किमान पंधरा ते तीस मिनिटे विश्रांती घेणे आवश्यक आहे. या काळात नैसर्गिक पद्धतीने शरीराचे तापमान सामान्य होऊ द्यावे. पंख्याखाली बसणे, घाम सुकू देणे आणि साध्या तापमानाचे पाणी पिणे यामुळे शरीराचे अंतर्गत तापमान स्थिर होण्यास मदत होते.

स्नानासाठी पाण्याचे तापमान कसे असावे, हा देखील एक महत्त्वाचा मुद्दा आहे. उष्णतेतून आल्यानंतर एकदम थंड पाण्यापेक्षा कोमट किंवा शरीराच्या तापमानाशी जुळणार्या पाण्याचा वापर करणे अधिक सुरक्षित मानले जाते. कोमट पाण्यामुळे शरीराला हळूहळू थंडावा मिळतो आणि रक्ताभिसरण सुरळीत राहते. तुम्ही खूप वेळ उन्हात काम केले असेल किंवा प्रवासातून आला असाल, तर प्रथम ओल्या रुमालाने शरीर पुसून घेणे हा एक उत्तम पर्याय आहे. यामुळे शरीरातील उष्णता सावकाश बाहेर पडते.

अनेकांना असे वाटते की, थंड पाण्याने स्नान केल्यास उन्हाचा चटका कमी होईल. प्रत्यक्षात अंतर्गत उष्णता कोंडली जाण्याची शक्यता असते. उष्माघात, स्नायूंचे पेटके आणि अशक्तपणा टाळण्यासाठी घाईघाईने स्नान करण्याऐवजी थोडा संयम राखणे हिताचे ठरते. सुरक्षित राहण्यासाठी निसर्ग आणि विज्ञान यांचा समन्वय साधत शरीराचा नैसर्गिक वेग ओळखणे हीच उन्हाळ्यातील आरोग्याची गुरुकिल्ली आहे.

## उन्हाळ्यात ऊसाचा रस पिताय? डॉक्टरांनी दिला इशारा

उन्हाळ्याच्या कडक उष्णतेत ऊसाचा रस अनेकांसाठी दिलासा देणारा असतो. रस्त्याच्या कडेला मिळणारा हा गोड आणि थंड रस शरीराला ताजेतवाने करतो, ऊर्जा देतो आणि डिहायड्रेशनपासून बचाव करण्यासाठीही अनेक जण तो आवडीने पितात. मात्र दिसायला हेल्दी वाटणारा हा रस आरोग्यासाठी धोकेही निर्माण करू शकतो, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

नारायणा हेल्थ मधील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. मुकेश नंदल यांच्या मते, ऊसाचा रस शरीराला पटकन ऊर्जा आणि हायड्रेशन देतो, पण त्याचं अतिसेवन किंवा अस्वच्छ ठिकाणचा रस आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो.

**नैसर्गिक साखरही ठरू शकते धोकादायक**

ऊसाच्या रसात नैसर्गिक साखरेचं प्रमाण खूप जास्त असतं. ऊसाचा रस तयार करताना त्यातील फायबर कमी होतं. त्यामुळे साखर थेट रक्तात वेगाने मिसळते. यामुळे रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढू शकते. विशेषतः मधुमेह असलेल्या लोकांसाठी हे धोकादायक ठरू शकतं. तज्ज्ञांच्या मते, जास्त प्रमाणात ऊसाचा रस प्यायल्यास लठ्ठपणा आणि फॅटी लिव्हरचा धोका वाढू शकतो.

**कोणत्या लोकांनी विशेष काळजी घ्यावी?**

मधुमेह, लठ्ठपणा किंवा फॅटी लिव्हरची समस्या असलेल्या लोकांनी ऊसाचा रस मर्यादित प्रमाणात घ्यावा. अशा लोकांनी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय मोठ्या प्रमाणात रस पिणं टाळावं. गींळलश

**अस्वच्छतेमुळे होऊ शकतात गंभीर आजार**

ऊसाच्या रसाशी संबंधित आणखी एक मोठा धोका म्हणजे स्वच्छता. जर रस काढण्याची मशीन नीट साफ नसेल, ग्लास स्वच्छ नसतील किंवा वापरलेलं पाणी आणि बर्फ दूषित असेल तर गंभीर संसर्ग होऊ शकतो. यामुळे टायफॉइड, कॉलरा आणि हिपॅटायटिससारख्या आजारांचा धोका वाढू शकतो.

**काय काळजी घ्यावी?**

तज्ज्ञांच्या मते, नेहमी स्वच्छ आणि विश्वासार्ह ठिकाणाहूनच ऊसाचा रस घ्यावा. रस काढण्याची मशीन, ग्लास आणि बर्फाची गुणवत्ता तपासणं महत्त्वाचं आहे. तसेच अतिप्रमाणात रस पिणं टाळावं. ब्रेकिंगन्यूज अलर्ट

**ऊसाचा रस वाईट आहे का?**

तज्ज्ञ सांगतात की, योग्य प्रमाणात आणि स्वच्छ ऊसाचा रस शरीराला ऊर्जा आणि हायड्रेशन देण्यासाठी फायदेशीर ठरू शकतो. मात्र कोणतीही गोष्ट मर्यादेतच चांगली असते. त्यामुळे योग्य काळजी घेऊनच ऊसाच्या रसाचं सेवन करणं गरजेचं आहे.



# ट्रम्प यांची खुमखुमी कायम



गेल्या महिन्यात 'जीएसटी' संकलनाने उच्चांक गाठल्याचे सरकार अभिमानाने सांगेल. डॉलरच्या तुलनेत रुपया घसरल्याने आयात महागली आहे. महाग वस्तूंच्या आयातीमुळे आयात शुल्कातून महसूल जास्त मिळाला हे खरे कारण आहे.

अमेरिका आणि इराण यांना संघर्ष थांबवायचा आहे की नाही? हे जगास कळेनासे झाले आहे.

अमेरिकेने पुढाकार घेऊन युद्धबंदी जाहीर केल्याने सध्या ते एकमेकांवर हल्ले करत नसले तरी वाग्युद्ध सुरुच आहे. अमेरिकेने हल्ले केले तर त्यास दीर्घ काळ आणि वेदनादायक प्रत्युत्तर दिले जाईल असा इशारा इराणने दिला. त्याच्या दुसर्याच दिवशी त्यांनी युद्ध कायमचे थांबवण्यासाठी एक प्रस्ताव सादर केला. तो अर्थातच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नाकारला. हा संघर्ष अचानक, मुद-तीपूर्वी थांबणार नाही असे ते म्हणाले. त्यांच्या दृष्टीने 'मुदत' काय आहे? होर्मुझच्या सामुद्रधुनीची अमेरिकेने केलेली नाकेबंदी चर्चेपूर्वी उठवावी, ही अट इराणने मागे घेतली आहे. अमेरिकेने नाकेबंदी रद्द केली व नवे हल्ले केले नाहीत, तर होर्मुझसह सर्व मुद्द्यांवर चर्चा करता येईल असे इराणने म्हटले आहे. कायमची युद्धबंदी झाल्यानंतर आपल्या आण्विक कार्यक्रमावर चर्चा करता येईल, असेही इराणने सुचवले आहे; पण अमेरिकेसाठी वादाचा व महत्त्वाचा मुद्दा तोच आहे. ज्याच्याशी आपण सहमत होऊ शकत नाही असे इराण सुचवत आहे, असे ट्रम्प म्हणाले. 'वेड्या माणसांकडे आण्विक अस्त्रे असता कामा नयेत म्हणून अमेरिका इराणशी युद्ध करत आहे' हे त्यांचे विधान आहे. इराणला वेडे ठरवण्याचा अधिकार त्यांना कोणी दिला?

**भारतास झळा**–अमेरिकन कायद्यानुसार ६० दिवस युद्ध करण्याचा अधिकार सरकारला आहे. ती मुदत कधीच संपली आहे. संघर्ष पुढे चालू ठेवण्यासाठी काँग्रेसची संमती घेणे ट्रम्प प्रशासनास आवश्यक आहे; मात्र काँग्रेसच्या संमतीची आपल्याला गरज नाही, असेही ट्रम्प म्हणाले आहेत. घटना, कायदा, संसद यांना न जुमानण्याची ट्रम्प यांची वृत्ती आहे. तसे करणारे ते एकटे 'लोकशाही' नेते नाहीत, ही खेदाची बाब आहे. आपण इराणला थोपवले नसते, तर पश्चिम आशिया, इस्रायल आणि युरोप उद्ध्वस्त झाले असते, असा ट्रम्प यांचा दावा आहे. तो त्यांनी कशाच्या आधारावर केला आहे? इराणने या देशांवर हल्ले केल्याचे गेल्या अनेक दशकांत दिसलेले नाही. इराण प्रबळ होणे इस्रायलला नको आहे आणि इस्रायलला ट्रम्प जवळचा मित्र मानत आहेत म्हणून हे युद्ध सुरु झाले हे जग जाणून आहे. इस्रायलने पॅलेस्टाइनवर हल्ले केल्यानंतर अमेरिकेत ज्यु विरोधी भावना वाढली. ती दडपण्याचा प्रयत्न ट्रम्प यांनी केला. कारण ट्रम्प व इस्रायल 'उजव्या' विचारांचे आहेत. इराणचे नौदल, हवाईदल आपण नष्ट केल्याची शेखी मिरवतानाच त्या देशाकडे नेतेही उरलेले नाहीत, असे ट्रम्प म्हणाले. आणखी तीन वर्षांनी पुन्हा समस्या निर्माण होऊ नये यासाठी आम्ही तेथून लवकर बाहेर पडणार नाही असे ते ठामपणे म्हणाले आहेत. युद्ध लवकर संपणार नाही, होर्मुझची सामुद्रधुनी खुली होणार नाही, असे संकेत मिळाल्याने जागतिक बाजारात खनिज तेलाचे दर शुक्रवारी पुन्हा वाढले. केंद्र सरकारने स्वयंपाकाच्या गॅसच्या व्यावसायिक सिलिंडरची किंमत कामगार दिनी तब्बल ९९३ रुपयांनी वाढवली. युद्ध सुरु झाल्यापासून या सिलिंडरच्या दरात तीन वेळा वाढ करण्यात आली आहे. त्याची किंमत सरासरी ३ हजार रुपयांपेक्षा जास्त झाली आहे. हॉटेल व खाना-वळीतील पदार्थांचे दर किमान १० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. गॅसची टंचाई झाल्यानंतर हॉटेलात खाणे महागले होतेच, त्यात भर पडेल. खानावळीत भोजन करणे भाग असणार्या सामान्यांना त्याची झळ बसेल. औद्योगिक उत्पादन निर्देशांकाने मार्चमध्ये ४.१ टक्का वाढ नोंदवली. पाच महिन्यांतील ही सर्वात कमी वाढ आहे. फेब्रुवारीत हा दर ५.१ टक्के होता. मार्चमध्ये निर्यात गेल्या वर्षाच्या तुलनेत ७.४४ टक्क्यांनी घटली. दोन्ही बाबी परस्परांशी संबंधित आहेत. यामुळे रोजगारही घटले असतील; पण त्याची माहिती सरकारने अजून जाहीर केलेली नाही. युद्ध जर अजून रेंगाळले तर निर्यात, पर्यटन या उद्योगांना मोठा फटका बसेल. उच्च व उच्च मध्यम वर्गास महागाई जाणवत नाही; पण क्रयशक्ती घटलेल्या सामान्यांचे हाल वाढतील. ट्रम्प यांची युद्धाची खुमखुमी विकसनशील देशांना व तेथील नागरिकांना महागाईच्या संकटात लोटत आहे.

# माऊंट एव्हरेस्ट सर्वात जास्त पर्यटकांची पसंती



माऊंट एव्हरेस्ट हे नाव घेताच आपल्या डोळ्यासमोर एका शांत, निवांत आणि सुंदर पर्वतशिखराचे चित्र उभे राहते. मात्र वस्तुस्थिती काही वेगळीच आहे. जगातील सर्वात मोठे पर्वतशिखर म ानल्या गेलेल्या हे शिखर आता जगातील सगळ्यात गर्दीचे शिखर ठरण्याची वेळ आली आहे.

एव्हरेस्ट सर करण्याची इच्छा बाळगणाऱ्यांमध्ये दिवसेंदिवस वाढच होत आहे. एडमंड हिलरी आणि तेनजिंग नोर्गे यांनी १९५३ साली एव्हरेस्ट शिखर पहिल्यांदा सर केले होते. त्यानंतर आतापर्यंत ४ हजार गिर्यारोहक एव्हरेस्टच्या शिखरावर पोहोचले आहेत. यंदा आतापर्यंत ३७८ गिर्यारोहकांनी नेपाळ सरकारकडे एव्हरेस्ट चढण्यासाठी परवानगी मागितली आहे. या गिर्यारोहकांकडून परवानगीसाठी मोठी रक्कम मिळते, त्यामुळे नेपाळ सरकारही या संख्येवर नियंत्रण आणण्याचा विचार करत नाही. त्याचाच दुष्परिणाम म्हणून एव्हरेस्ट आता गर्दीने गजबजले आहे.निर्मल पुरजा नावाच्या एका गिर्यारोहकाने अलीकडेच एक छायाचित्र प्रसिद्ध केले आहे आणि त्यातून माऊंट एव्हरेस्टवरील परिस्थितीची कल्पना येऊ शकते.

गेल्या आठवड्यात एव्हरेस्टवर सात गिर्यारोहक मरण पावले आहेत. या बातमीच्या पार्श्वभूमीवरच प्रसिद्ध झालेल्या या छायाचित्राने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. जगातील सर्वात उंच शिखरांवर गिर्यारोहकांना कुठल्या स्थितीला तोंड द्यावे लागते, हे या चित्रातून दिसून येते.या छायाचित्रात माऊंट एव्हरेस्टच्या कडेने गिर्यारोहकांची लांबच लांब रांग लागल्याचे दिसून येते. एव्हरेस्टजवळ अशा लांब रांगा दिसणे ही सामान्य गोष्ट आहे का? तर होय, स्थानिक गाईडच्या मते, गिर्यारोहणाच्या मोसम ात सर्रास दिसणारे हे चित्र आहे.

सेव्हन समिटस ट्रेक्सचे अध्यक्ष मिंगमा शेर्पा यांनी बीबीसीशी बोलताना सांगितले, की सामान्यत: एवढी गर्दी नक्कीच असते. गिर्यारोहकांना शिखर गाठण्यासाठी २० मिनिटांपासून १.५ तासांपर्यंत रांगेत उभे रा-हावे लागते. चढाईसाठी योग्य हवामानाची किती वाट पाहावी ला-गते, यावर ते अवलंबून असते कारण गिर्यारोहकांना भयंकर वेगाने वाहणारे वारे टाळावे लागते.फ्जर हवामान एक आठवडा निर्धो क असेल तर शिखरावर गर्दी नसते. मात्र कधीकधी जेव्हा केवळ दोन किंवा तीन दिवसांचे सुरक्षित हवामान मिळते तेव्हा तिथे खूप गर्दी होते कारण सर्व गिर्यारोहक तिथे एकाच वेळेस तिथे पोचण्याचा प्रयत्न करतात,ङ्ग असे मिंगमा शेर्पा यांचे म्हणणे आहे.

अर्थात एव्हरेस्टवरच्या गर्दीची चर्चा होण्याची ही पहिलीच वेळ नाही. राल्फ डुजमोव्हिट्स नावाच्या जर्मन गिर्यारोहकाने २०१२ मध्ये असेच एक छायाचित्र घेतले होते आणि ते व्हायरलही झाले होते. त्या छायाचित्रातही एव्हरेस्टवरील गिर्यारोहकांची रांग दिसत होती. या रांगेला त्याने फ्कोन्गा लाइनङ्ग असे नाव दिले होते.डुजमोव्हिट्स यांनी १९९२ मध्ये एव्हरेस्टवर पाऊल ठेवले होते आणि त्यानंतर सहा वेळेस या शिखरावर ८,००० मीटरपर्यंत (२६,२०० फूट) मजल मारली होती. शिखरावर अशा प्रकारच्या लांब रांगा लागणे हे धोकादायक ठरू शकते, असे त्यांचे म्हणणे आहे. फ्लोक जेव्हा रांगेत उभे राहतात तेव्हा त्यांना ऑक्सिजन कमी पडण्याचा धोका असतो आणि खाली उतरताना त्यांच्याकडे ऑक्सिजन पुरेसा नसतो.ङ्गस्वत: डुजमोव्हिटस यांच्याकडचे ऑक्सिजन१९९२ मध्ये खाली उतरताना संपले होते. फ्त्यावेळी कोणीतरी मला लाकडी हातोड्याने मारत असल्यासारखे वाटले. केवळ नशिबाने मी पुरेशी रिकव्हरी करू शकलो आणि शेवटी माझ्या मार्गावर सुरक्षितपणे उतरू शकलो,ङ्ग असे त्यांनी सांगितले.याहूनही वाईट म्हणजे एव्हरेस्टच्या मार्गावर गिर्यारोहकांसाठी ठेवलेले ऑक्सिजनचे सिलिंडरही कधीकधी चोरीला जातात. फ्एवढ्या उंचीवरील ऑक्सीजनची चोरी करणे हे एखाद्याला जीवे मारण्यासारखेच आहे,ङ्ग असे एव्हरेस्टवर तीनदा चढाई करणाऱ्या माया शेर्पा यांनी सांगितले.अलिकडच्या वर्षांत एव्हरेस्टवरील गर्दी वाढण्याचे एक कारण म्हणजे गिर्यारोहण मोहिमांचे वाढते प्रमाण. एव्हरेस्टच्या नेपाळच्या बाजूला जास्त गर्दी आहे. वास्तविक तिबेटची बाजू अधिक सोपी आहे, परंतु चिनी सरकार गिर्यारोहकांना सर्रास परवानगी देत नाही आणि चढाईसाठी फारशी थरारक नाही. त्यामुळे दक्षिणेकडील नेपाळी बाजूला सगळे गिर्यारोहक जमा होतात. थोडक्यात म्हणजे अति तेथे माती या न्यायाने जगातील एका नैसर्गिक चमत्काराचे मानवी अतिक्रमणामुळे आपत्तीत रूपांतर होत आहे. हा वारसा जपायचा असेल तर हौसेला आवर घालायला पाहिजे.

# शरीराची कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती दूर करेल व्हिटॅमिन सी



आपल्या धावपळीच्या जीवनात आपण इतके व्यस्त होतो की आपली जीवनशैली गोंधळलेली बनते. त्याच वेळी, आपण सहजपणे योग्य खाणे देखील करू शकत नाही. या अनियमित जीवनशैली आणि सवयींचा आपल्या शरीरावर परिणाम होतो. त्यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती देखील कमकुवत होते. शरीरात सर्व प्रकारचे पोषक तत्व असणे महत्वाचे आहे, परंतु त्यांच्या कमतरतेमुळे अनेक रोगांचा धोका वाढतो. व्हिटॅमिन सी, एक पोषक तत्व, तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचे काम करते.

व्हिटॅमिन सी हे एक शक्तिशाली अँटिऑक्सिडेंट आहे जे शरीराला मुक्त रॅडिकल्सपासून वाचवते. हे अद्वितीय व्हिटॅमिन सी पोषक तत्व वृद्धत्व, त्वचेचे नुकसान आणि विविध रोगांशी लढण्यास मदत करते.

कोल्हापूरमध्ये घरात घुसून महिला डॉक्टरवर ओळखीच्या व्यक्ती कडून

त्यात कोलेजन असते, जे प्रथिने तयार करणारे एक प्रथिन असते. हे घटक निरोगी त्वचा, हाडे, स्नायू आणि रक्तवाहिन्या राखते. ते चमकणारी, मऊ आणि सुरकुत्यामुक्त त्वचा राखण्यास देखील मदत करते.

जर तुम्हाला अशक्तपणाचा त्रास होत असेल तर तुम्ही व्हिटॅमिन सीचे सेवन करावे. या व्हिटॅमिनचे सेवन केल्याने शरीराची लोहाची गरज पूर्ण होते. ते अशक्तपणा रोखण्यास मदत करते, जखमा बरे होण्यास प्रोत्साहन देते आणि हिरड्यांच्या आरोग्यासाठी देखील आवश्यक आहे. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करून, ते सर्दी, खोकला आणि इतर संसर्गांपासून संरक्षण करण्यास मदत करते.

व्हिटॅमिन सीचे सेवन केल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते. ते रक्तदाब नियंत्रित करते आणि हृदयरोगाचा धोका कमी करते.

शिवाय, ते डोळ्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे, कारण ते मोतीबिंदू आणि वयाशी संबंधित दृष्टी समस्या टाळण्यास मदत करते.

-ङडज ठए-ऊ डोळे उच्च रक्तदाबाचे पहिले लक्षण देतात, कोणती आहे ही लक्षणे जाणून घ्या

व्हिटॅमिन सीचे सेवन करण्यासाठी नैसर्गिक स्रोतांची मदत घेऊ शकता. नैसर्गिक स्रोतांपैकी आवळा हा सर्वात श्रीमंत मानला जातो. याशिवाय संत्री, लिंबू, पेरू, किवी, स्ट्रॉबेरी, अननस, टोमॅटो, सिमला मिरची, ब्रोकोली आणि हिरव्या पालेभाज्या हे देखील त्याचे चांगले स्रोत आहेत.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

माणसाची लैंगिक इच्छा आणि शक्ती वाढवण्यासाठीचे नैसर्गिक मार्ग शोधण्यासाठी हल्ली सातत्याने संशोधन होत आहे. डाळिंबाचा रस हा मव्हायग्राफ्सारखेच काम करू शकतो हे अलिकडेच सिद्ध झालेले आहे. आता टरबूज (कलिंगड)ही असाच परिणाम करू शकते, असे संशोधकांनी म्हटले आहे. उन्हाळ्यात शरीराला थंडावा देणारे हे फळ याबाबतीतही उपयुक्त आहे.भारतीय वंशाच्या एका संशोधकाच्या नेतृत्वाखाली हे संशोधन अमेरिकेत झाले आहे. त्यात संशोधकांना असे दिसून आले की कलिंगड

## २ Joke विनोद




बगारामला एकदा एका जुन्या पडक्या इमार-तीत रात्र घालविण्याचा प्रसंग आला. वॉचम नला बगारामने विचारले, काय रे बाबा, इथे या खोलीत काही विशेष घटना घडली आहे का ? गेल्या २५ वर्षात तरी नाही घडलेली वॉचमन म्हणाला, म्हणजे २५ वर्षांपुर्वी काय विशेष घडले होते ? बगारामने उत्सुकतेने विचारले. वॉचमन म्हणाला, २५ वर्षापूर्वी एक माणूस इथे याच खोलीत रात्रभर राहिला आणि सुखरुप घरी निघून गेला होता.

## ३ Message संदेश



Pappu: Papa ghar mein mehmaan aae hain aur sharabat bnaane ke lie nemboo nahin hai, ab kya karoon? Santa: abe, darata kyon hai? nae Vim Baar mein 100 neemboo kee shakti hai, daal de 2 boond beta!.

## ४ Thought सुविचार



प्रयास हा प्रतिभेचा प्राणवायू आहे. – पु.ल. देशपांडे

**संस्कृत सुभाषित**

**काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्।**
**व्यसने च मुर्खाणां निद्रया कलहेन वा।।**

अर्थ –बुद्धिमान लोकांचा वेळ काव्य, शास्त्र, विनोदात (विद्याप्राप्ती करण्यात, चिंतन करण्यात, चांगल्या चर्चा करण्यात आदी) व्यतीत होतो, तर व्यसनात, झोपेत किंवा भांडणात मुर्खांचा वेळ जातो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज
४. नीच, पापी, दुष्ट
७. विश्रांती
१०. मळलेला
११. उफाड्याचा (बांधा)
१३. प्रामाणिक
१५. अवास्तव
१६. मिठी
१७. गावबाहेरची वस्ती
१९. तालासुराची गट्टी
२०. खाली पडू न देता, नेहमी
२१. चेहऱ्यावरील तेज
२३. प्रफुल्लित
२६. बारा वर्षांचा काळ
२८. लहान
२९. पाणकोंबडा
३०. दिखाऊ, खोलवर नसलेले
३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ
३५. रहस्य
३७. लोखंड घासण्याचे साधन
३९. फिरणे, चक्कर येणे
४२. अपमान
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. युवराज
४६. एकरूप
४८. बडबड
५०. चंद्र
५३. प्रश्न
५५. नवीन आलेला
५७. मृत्यू नसलेला
५८. जंगली
६०. निकट
६१. अनुमती
६३. फणसाचा एक प्रकार
६५. पाप
६८. वितरण
७०. दोन महान ग्रंथ
७२. मगज
७३. उद्याच्या नंतरचा दिवस
७४. कणीदार
७५. मोठी बहीण
७६. विठ्ठलाची पत्नी
७७. नाराजी

### उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे
२. खंड
३. ताणलेल्या दोरीचा आवाज
४. तानाजीला मिळालेली पदवी
५. हिंमत
६. कपाळभर लावलेले कुंकू
७. कहाणीतील गाव
८. दीर्घ उच्चराने नरम
९. भ्रम
१४. नवरदेव
१५. इंद्रिय
१८. जरा उणीच!
२२. वेदना
२४. व्रत,२५. पूजेचे नक्षीदार ताट
२५अ. जहाज लुटणारे
२७. खाट, बाज
३०. सिंह, जगलाचा राजा
३१. आवड
३२. रमापती
३४. दरवाजा
३६. सापाची एक जात
३८. नीच, दुष्ट
४०. नामघोष
४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत,४२. अवस
४४. मानी स्त्री
४५. राजाची पत्नी
४६. षष्ठीची देवता
४७. पावसाची धार
४८. देश, जमीन
४९. अरण्य
५१. आगबोट
५२. द्वाड, खोडकर
५३. युद्ध
५४. एक सुगंधी वनस्पती
५६. धुसफूस, त्रास
५७. पुष्कळ, खूप
५८. संतापी
५९. समीक्षा
६२. बाजेची कापडी पट्टी
६४. मर्यादा, सीमा
६५. विजार
६६. पंकज
६७. छोटे जाजम
६९. केशरी गराचे स्वस्त फळ
७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!
७२. मासा पकडण्याचे साधन

### आडवे उत्तरे

१.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अव-हेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

### उभे उत्तरे

१.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### लीगची फायनलमध्ये मारली धडक

मुंबई-कसोटीचा फलंदाज असा शिक्का बसल्याने मार्नस लबूशेनचा ऑस्ट्रेलियाच्या टी२० संघासाठी विचारदेखील होत नाही. टी२० संघातील प्रमुख खेळाडूंना विश्रांती देण्यात आली तेव्हा लबूशेनला टी२० पदार्पणाची संधी देण्यात आली. त्यालाही आता चार वर्ष झाली आहेत. याच लबूशेनला नुसतं संघात नव्हे तर कर्णधार करण्याचं पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेतील हैदराबाद किंग्जमेन व्यवस्थापनाने ठरवलं. किंग्जमेन संघाचंही पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेतलं पहिचंच वर्ष. त्यांनी धाडसी निर्णय घेण्याचं ठरवलं. टी२० प्रकारापासून दूर असलेला आणि तंत्रशुद्ध फलंदाज म्हणून ख्याती असलेल्या मार्नस लबूशेनकडे कर्णधारपद सोपवण्यात आलं. लबूशेनने फलंदाज आणि कर्णधार म्हणून स्वत:ला सिद्ध केलं आणि किंग्जमेन संघाने पदार्पणाच्या हंगामात फायनलमध्ये धडक मारली.रविवारी लाहोर इथे झालेल्या फायनन मुकाबल्यात पेशावर झाल्मीने किंग्जमेन संघाला नमवत जेतेपदावर नाव कोरलं. झाल्मी संघाचं या स्पर्धेचं हे दुसरं जेतेपद आहे. पहिल्याच हंगामात फायनलपर्यंत धडक मारणाऱ्या किंग्जमेन संघाचं आणि प्रामुख्याने कर्णधार लबूशेनचं क्रिकेटविश्वात कौतुक होत आहे.लबूशेनने ऑस्ट्रेलियासाठी एकमेव टी२० सामना खेळला आहे.

### मुंबई इंडियन्सने राखला रोहित शर्माचा मान!

मुंबई-आयपीएल २०२६ मध्ये सोमवारी मुंबई इंडियन्सचा सामना लखनऊ सुपरजाएंट्सविरुद्ध होत आहे. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर ही लढत होईल. प्ले-ऑफच्या दृष्टीने या सामन्याचं फार महत्त्व नाही, कारण दोन्ही टीम या प्ले-ऑफच्या रेसमधून जवळपास बाहेर झाल्यातच जमा आहेत. पॉईंट्स टेबलमध्ये मुंबई नवव्या आणि लखनऊ शेवटच्या म्हणजेच दहाव्या क्रमांकावर आहे.
मुंबईने या मोसमात ९ पैकी फक्त २ सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे तर लखनऊने ८ पैकी २ सामने जिंकले आहेत. दोन्ही टीम ४-४ पॉईंट्सवर असल्यामुळे उरलेल्या सर्व सामन्यांमध्ये विजय मिळवला तरी दोन्ही टीम प्ले-ऑफमध्ये पोहोचणं जवळपास अशक्य आहे, त्यामुळे दोन्ही टीम अब्रू वाचवण्यासाठी मैदानात उतरतील.
रोहित खेळणार का नाही?
आयपीएलच्या या मोसमात आरसीबीविरुद्धच्या सामन्यावेळी रोहित शर्माच्या हॅमस्ट्रिंगला दुखापत झाली, यानंतर पुढच्या ५ सामन्यांमध्ये रोहित मैदानात उतरलेला नाही. आता लखनऊविरुद्धच्या सामन्यात रोहित खेळणार का नाही? याबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. मॅचच्या आदल्या दिवशी रोहितने वानखेडे स्टेडियमवर एक तास बॅटिंग केली, तसंच फिटनेस ड्रिल्सही केले.

### विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे दि. ६ ते ८ मे पर्यंत पुण्यात आयोजन

पुणेमुंबई-अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलच्या क्रीडास्पर्धेचे आयोजन बुधवार (दि. ६) ते शुक्रवारपर्यंत (दि. ८) बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलामध्ये करण्यात आले आहे. या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये १० राज्यांतील विविध विद्युत कंपन्यांचे पुरुष व महिला गटातील तब्बल ४१ संघ सहभागी होत आहेत.या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रासह गुजरात, हरियाणा, तेलंगाणा, राजस्थान, उत्तराखंड, पंजाब, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, दिल्ली आदी राज्यांतील सरकारी व खासगी विद्युत कंपन्यांचे ४१ संघ आणि सुमारे ५३८ महिला व पुरुष खेळाडू सहभागी होत आहेत. कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलमध्ये पुरुष संघात लढत होईल तर कबड्डी व खो-खोमध्ये महिला संघांचा समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्पर्धेतील अजिंक्यपदासाठी कबड्डीमध्ये पुरुष व महिला गटातील १८ संघ तर खो-खोसाठी ९ संघ सहभागी होत आहेत. तसेच कुस्ती व बास्केटबॉलमध्ये अजिंक्यपदासाठी पुरुष गटामध्ये प्रत्येकी ७ संघांमध्ये लढत होणार आहे.

## धोनीच्या पुनरागमनाची प्रतीक्षाच; आज दिल्लीविरुद्धच्या सामन्यालाही मुकणार



महेंद्रसिंह धोनीच्या पुनरागमनाची प्रतीक्षा पुन्हा लांबली आहे. पायाच्या दुखापतीमुळे धोनी दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या आजच्या सामन्याला मुकणार असून चेन्नई सुपर किंग्जसाठी हा सामना 'प्ले-ऑफ'च्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. महेंद्रसिंह धोनी अद्याप दुखा-पतीतून सावरलेला नसल्याने दिल्लीविरुद्धच्या सामन्यात तो खेळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

नवी दिल्ली : चेन्नई सुपर किंग्जचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीच्या पुनरागमनाची प्रतीक्षा आणखी लांबली असून 'आयपीएल' क्रिकेटमध्ये आज, मंगळवारी होर्णाया दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यालाही तो मुकणार आहे. त्याने दिल्लीला प्रवास करणेही टाळले आहे. त्यामुळे यंदाच्या हंगामात धोनीला पहिला सामना खेळताना पाहण्यासाठी चाहत्यांना आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. चेन्नई आणि दिल्ली या दोनही संघांसाठी आजचा सामना महत्त्वाचा ठरणार आहे. दोन्ही संघांच्या खात्यावर आठ गुण असून त्यांचे पाच सामने शिल्लक आहेत. त्यामुळे 'प्ले-ऑफ'च्या शर्यतीत कायम राहण्यासाठी त्यांना उर्वरित सामन्यांत दर्जेदार खेळ करावा लागेल. दिल्लीने गेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सवर विजय मिळवून सलग तीन पराभवांची मालिका खंडित केली. परंतु दिल्लीसाठी घरच्या मैदानावरील गेले दोन सामने निराशाजनक ठरले आहेत. प्रथम त्यांना पंजाब किंग्जविरुद्ध तब्बल २६४ धावांचाही बचाव करता आला नाही.मग रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुविरुद्धच्या सामन्यात दिल्लीचा संघ अवघ्या ७५ धावांत गारद झाला. त्यामुळे आता घरच्या मैदानावर खेळताना फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तीनही विभागांत खेळ उंचावण्याचा त्यांचा मानस असेल. लयीत असलेल्या केएल राहुलवर दिल्लीच्या फलंदाजीची भिस्त असेल. गोलंदाजीत कर्णधार अक्षर पटेल, कुलदीप यादव आणि मिचेल स्टार्क यांच्याकडून अपेक्षा असतील.

दुसरीकडे, चेन्नईच्या संघाला सलग १०व्या सामन्यात धोनीविना खेळावे लागणार आहे. धोनी पायाच्या दुखापतीतून सावरत असून अद्याप पूर्णपणे तंदुरुस्त झालेला नाही. त्यामुळे दिल्लीविरुद्धच्या सामन्यासाठी तो उपलब्ध नसेल, असे चेन्नई संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी काशी विश्वनाथन यांनी वृत्तसंस्थेला सांगितले. धोनीच्या अनुपस्थितीत खेळताना चेन्नई संघाने हंगामाची सुरुवात सलग तीन पराभवांसह केली होती. परंतु त्यानंतर त्यांनी सहापैकी चार सामने जिंकले आहेत. आता 'प्ले-ऑफ'साठी आव्हान शाबूत राखण्याचा चेन्नईचा प्रयत्न असेल.

**वेळ : सायं. ७.३० वा. * थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, ३, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.**

## मुंबईचा राजा संघात परतला अन मुंबई इंडियन्सने जिंकला सामना! रेकॉर्डब्रेक विजय

मुंबईचा वानखेडेवर दणदणीत विजय
(फोटो-खझङ-द)



चख लशरीं ङडऋ लू ८ुळलज्ञशीी खझङ २०२६: मुंबईचा राजा रोहित शर्मा संघात परतला अनब मुंबई इंडियन्सने लखनौविरूद्धचा वानखेडेवरील सामना जिंकला. मुंबईने लखनौचा ६ विकेट्सने पराभव केला आहे. लखनौने मुंबईला विजयासाठी २२९ धावांचं लक्ष्य दिलं होतं आणि मुंबईने ८ चेंडू राखून विजय मिळवला. मुंबई इंडियन्सचं २२९ धावा हे आयपीएल इतिहासातील यशस्वीपणे गाठलेलं सर्वात मोठं लक्ष्य ठरलं आहे.
मुंबईचा राजा रोहित शर्माने घरच्या मैदानावर या सामन्यात ८४ धावांची खेळी केली, तर रायन रिकल्टनने ८३ धावा केल्या. मुंबई इंडियन्ससाठी प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी आजचा सामना करो या मरो असा होता. या सामन्यात हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीनंतर रोहित शर्मा परतला. तर कर्णधार हार्दिक पंड्या दुखापतीमुळे या सामन्यात खेळू शकला नाही. त्याच्या जागी सूर्यकुमार यादवने संघाचं नेतृत्त्व केलं.
लखनौ सुपर जायंट्सने दिलेल्या २२९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची सुरूवात दणक्यात झाली. रायन रिकल्टन व रोहित शर्माच्या जोडीने पहिल्या विकेटसाठी ६५ चेंडूत १४३

### रोहित-रिकल्टन ठरले हिरो

धावांची भागीदारी रचली. ही भागीदारीच मॅचविनिंग ठरली. रायन रिकल्टन ३२ चेंडूत ६ चौकार व ८ षटकारांसह ८३ धावा करत बाद झाला. तर रोहित शर्माने ४४ चेंडूत ६ चौकार व ७ षटकारांसह ८४ धावांची खेळी केली. तिलक वर्मा ११ धावा तर कर्णधार सूर्यकुमार यादवने १२ धावांचं योगदान दिलं. यानंतर नमन धीरने पुन्हा एकदा संघासाठी महत्त्वपूर्ण खेळी केली. नमन धीरने १२ चेंडूत ३ चौकार व एका षटकारासह २३ धावांची खेळी केली. तर विल जॅक्सने ४ चेंडूत १० धावांची खेळी करत मुंबईला १८.४ षटकांत विजय मिळवून दिला.

जावई असावा तर असा! रोहित शर्माचा शॉट पाहून सासरेबुवांचा जल्लोष, रितिकासह वडिलांची प्रतिक्रिया होतेय व्हायरल; तखअ्ज
लखनौ सुपर जायंट्सकडून मनिमरण सिद्धार्थने २ विकेट्स तर मोहम्मद शमी व मोहसीन खान यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या. तर मोहम्मद शमीने ४ षटकांत ५३ धावा तर आवेश खानने ३.४ षटकांत ५६ धावा दिल्या, ज्याचा लखनौला मोठा फटका बसला.बंगालमध्ये भारतीय वेगवान गोलंदाजाचा दबदबा! अशोक दिंडा यांचा मोयना मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा विजय-तत्पूर्वी मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकत लखनौला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. लखनौची सुरूवातही चांगली झाली, पण जोश इंग्लिस १३ धावा करत गझनफरच्या गोलंदाजीवर बाद झाला. यानंतर मिचेल मार्श व निकोलस पुरन यांनी दुसऱ्या विकेटसाठी ३४ चेंडूत ९४ धावा केल्या. मार्शने २५ चेंडूत ४ चौकार व ३ षटकारांसह ४४ धावांची खेळी केली. तर निकोलस पुरन आपल्या आक्रमक अंदाजात परतला आणि यंदाचं त्याने पहिलं अर्धशतक झळकावलं.
३३ वर्षीय रघु शर्माची पहिली खझङ विकेट! खिशातून नोट काढत केलं सेलिब्रेशन; पेपरवर काय लिहिलं होतं? सूर्याच्या प्रतिक्रियेने वेधलं लक्ष
निकोलस पुरनने या सामन्यात २१ चेंडूत १ चौकार व ८ षटकारांसह ६३ धावांची वादळी खेळी केली. कार्बिन बॉशने एकाच षटकात मार्श व पुरनला झेलबाद करत संघाला मोठ्या विकेट्स मिळवून दिल्या. यानंतर ऋषभ पंत १५ धावा, अक्षत रघुवंशी ११ धावांचं योगदान दिलं. एडन मारक्रमने २५ चेंडूत ३२धावा तर हिम्मत सिंगने ४० धावांच्या खेळी केल्या. या खेळीच्या बळावर लखनौ संघ २२८ धावांपर्यंत पोहोचला. पण मधल्या षटकांमध्ये मुंबईच्या गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी केल्याने लखनौचा संघ २५० चा पल्ला पार करू शकला नाही.

## आयपीएल २०२६ ची टीआरपी मोठ्या प्रमाणात घसरली? काय आहे कारण?

मुंबई-आयपीएल २०२६ चे अर्ध्याहून अधिक सामने झाले आहेत. मात्र, तेव्हापासून समोर आलेलं वास्तव लीगच्या प्रतिमेला जुळत नाही. आयपीएल मनोरंजक आणि रोमांचक मानली जाते. पण असं असताना, टीआरपी कुठे आहे? आयपीएल २०२६ च्या टीआरपीमध्ये मोठी घसरण झाली आहे. मात्र, हा मुद्दा केवळ टेलिव्हिजन रेटिंग पॉइंट्सचा नाही, तर प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याच्या आणि जाहिरातदारांना आकर्षित करण्याच्या लीगच्या क्षमतेचाही आहे. या हंगामात या दोन्ही बाबतीत मोठं अपयश आलं आहे.आयपीएल २०२६ चं टीआरपी किती घसरलं? : सर्वप्रथम आपण टीआरपी किंवा टेलिव्हिजन रेटिंग पॉइंट्सबद्दल बोलूया, जे टॅम स्पोर्ट्स आणि बार्क इंडिया यांच्या आकडेवारीनुसार दिले जात आहेत. यानुसार, आयपीएल २०२६ चे टीआरपी १८.८ टक्क्यांनी घसरलं आहेत. आयपीएल २०२६ चं टीआरपी ४.५७ वरुन ३.७१ पर्यत खाली आले आहेत. आयपीएल २०२६ ची सरासरी प्रेक्षकसंख्या देखील २६ टक्क्यांनी घटली आहे. त्याची एकूण पोहोच देखील ८.३ टक्क्यांनी घटून १२४ दशलक्ष वरुन ११३.६ दशलक्ष झाली आहे.

## आयपीएल २०२६मध्ये सीएसकेला धक्का!

मुंबई-चेन्नई सुपर किंग्जचा आगामी सामना दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध होणार आहे, हा सामना दोन्ही संघासाठी महत्वाचा असणार आहे. दिल्ली आणि चेन्नईचे आतापर्यत ९ सामन्यांनंतर ८ गुण आ-हेत त्यामुळे आता संघ प्लेऑफमध्ये कशी जागा मिळणार याकडे सर्वाचे लक्ष लागले आहे. चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स यांच्यामध्ये सामना होण्याआधी सीएसकेच्या संघाला मोठा धक्का बसला आहे. मागील सामन्यामध्ये चेन्नई सुपर किंग्जच्या संघासाठी पदार्पण करणारा रामकृष्णन घोस यासाठी खराब बातमी आहे. सुरुवातीपासून सीएसकेच्या संघाला दुखापतीमुळे सातत्याने खेळाडूंमध्ये बदलीचे सत्र पाहायला मिळाले आहे, त्यामुळे आता एम आयविरुद्ध सामन्यात रामकृष्णन घोस याने पदार्पण केले होते आणि त्यानंतर आता त्याला स्पर्धा सोडावी लागली आहे.
सीएसकेची सोशल मिडिया पोस्ट
चेन्नई सुपर किंग्जच्या संघाने त्याच्या सोशल मिडियावर एक पोस्ट शेअर केली आहे यामध्ये त्यांनी लिहीले आहे की, चेपॉकमध्ये झालेला सामना चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध मुंबई इंडियन्स यांच्यामध्ये झाला या सामन्यादरम्याने रामकृष्ण घोष यांच्या उजव्या पायाला फ्रॅक्चर झाले आहे, त्यामुळे तो आता आयपीएल २०२६ मध्ये पुढे सहभागी होणार नाही, त्यांनी पुढे लिहीले आहे की रॅम्बो, लवकर बरे हो.
सीएसकेची ९ सामन्यातील कामगिरी
चेन्नई सुपर किंग्जच्या संघाने आतापर्यत ९ सामने खेळले आहे, यामध्ये त्यांची सुरुवात ही चांगली झाली आहे सुरुवातीचे सामने गमावल्यानंतर आता संघाने ९ पैकी ४ सामने जिंकले आहेत तर पाच सामन्यात त्यांचा पराभव झाला आहे. मागील सामन्यामध्ये त्यांनी मुंबई इंडियन्सविरुद्ध विजय मिळवला होता. सध्या गुणतालिकेमध्ये संघ सहाव्या स्थानावर आहे, तर संघाचे ८ गुण आहेत. पुढील सामन्यावर सीएसकेच्या संघाची नजर असणार आहे. सीएसकेला प्लेऑफमध्ये जाण्यासाठी काय करावे लागणार? सीएसकेच्या संघाने आतापर्यत चार सामने जिंकले आहेत यामधील त्यांना आणखी प्लेऑफमध्ये जाण्यासाठी ४ विजयाची गरज आहे. संघाचे आतापर्यत ५ सामने शिल्लक आहेत यामधील दोन सामने हे लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध तर एक सामना दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध होणार आहे. त्यामुळे आता संघाने आगामी जवळजवळ सर्व सामने जिंकले तर त्याचे १८ गुण होतील आणि जर एक सामना गमावला तरी संघाचे १६ गुण झाले तरी संघाला प्लेऑफमध्ये जाण्याच्या आशा असणार आहेत.

## पांड्याला ४४० व्होल्टचा झटका! बीसीसीआय तातडीने बंद करणार मनमानी कारभार



मुंबई-भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्ड म्हणजेच बीसीसीआयने आयपीएलची रंगत वाढावी यासाठी अनेक उपाययोजना करताना दिसतीये. अनेक नवे नियम आणले गेले तर काही गोष्टींवर बीसीसीआयने बंदी देखील घातली आहे. अशातच आता बीसीसीआय लवकरच 'गर्लफ्रेंड कल्चर' संदर्भात कडक पावलं उचलण्याच्या तयारीत आहे. यंदाच्या आयपीएलमध्ये खेळाडूंच्या कामगिरीसह त्यांच्या खासगी आयुष्यावर अधिकाधिक चर्चा होताना दिसते. अशातच क्रिकेट बोर्डाने कडक पाऊल उचलण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे पांड्यासह इतर खेळाडूंना मोठा धक्का बसणार आहे.
हार्दिक पांड्या, अर्शदीप सिंग, यशस्वी जयस्वाल, परदेशी खेळाडूंसह आणि ईशान किशन यांसारख्या अनेक खेळाडूंसोबत त्यांच्या गर्लफ्रेंडची उपस्थिती सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. खेळाडूंच्या गर्लफ्रेंड मैदानापुरत्याच नाही तर टीम बससह हॉटेलपर्यंत दिसून येत आहेत. त्याचबरोबर काही खेळाडूंनी तर हॉटेलमध्ये त्यांच्यासोबत राहण्यासाठी परवानगी घेतल्याचेही समोर आलं आहे. त्यामुळे आता आयपीएलवर सट्टेबाजीचं सावट निर्माण झालंय. अनेक खेळाडूंच्या गर्लफ्रेंड सट्टेबाजी वेबसाइट्स प्रमोट करणाऱ्या इन्फ्लूएंसर राहिल्या आहेत, तर काही खेळाडूंवर त्यांच्या गर्लफ्रेंडनी पोलीस तक्रारीही केल्या आहेत. त्यामुळे बीसीसीआय कोणतीही रिस्क घेता थेट या गोष्टींवर आवर घालण्याच्या तयारीत आहे. ऑस्ट्रेलियातील मागील टेस्ट सिरीजमधील पराभवानंतर बोर्डाने खेळाडूंसाठी 'फॅमिली क्लॉज' नियम कडक केले होते.'फॅमिली क्लॉज' नियम काय आहे?
बीसीसीआयच्या 'फॅमिली क्लॉज' नियमानुसार, ज्यानुसार परदेश दौऱ्यावर पार्टनर किंवा मुले ४५ दिवसांपेक्षा जास्त काळ असल्यास त्यांना केवळ २ आठवडे सोबत राहण्याची मुभा असते. आता अशाच स्वरूपाचे नियम आयपीएलसाठीही लागू करण्याचा विचार सुरू आहे.

## तिरंगी क्रिकेट स्पर्धेत जब्बार इलेव्हचा दमदार कामगिरी करत विजय

लातूर (प्रतिनिधी): दयानंद मैदानावर मैत्री क्रिकेट क्लबतर्फे आयोजित करण्यात आलेल्या तिरंगी क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुरुवातीपासून अखेरपर्यंत रंगलेल्या या स्पर्धेत जब्बार इलेव्हनने दमदार कामगिरी करत विजेतेपदावर नाव कोरले, तर मेजर इलेव्हनने उपविजेतेपद पटकावत प्रभावी खेळाची छाप पाडली. रणजीत इलेव्हन संघाने देखील खेळातील जिद्द आणि संघर्षाची परिसीमा गाठत प्रेक्षकांची दाद मिळवली.

स्पर्धेदरम्यान फलंदाजांनी फटकेबाज खेळाची आतषबाजी करत मैदान गाजवले, तर गोलंदाजांच्या अचूक आणि टंच चेंडूंनी सामन्यांची रोमांचकता अधिकच वाढवली. प्रत्येक सामन्यात प्रेक्षकांचा उत्साह आणि टाळ्यांचा कडकडाट अनुभवायला मिळाला.

समारोप प्रसंगी झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात मैत्री क्रिकेट क्लबचे पदाधिकारी, मान्यवर, तसेच क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विजेत्या संघाला ज्येष्ठ क्रिकेट पटू यांच्या हस्ते आकर्षक ट्रॉफी आणि

**सिरीजमधील विशेष कामगिरी करणारे खेळाडू:**

**सामनावीर : संकेत कैले**

**मालिकावीर : माधव गोमारे**

**उत्कृष्ट फलंदाज : माधव गोमारे**

**उत्कृष्ट गोलंदाज : अशोक खंडागळे**

**उत्कृष्ट क्षेत्ररक्षक : प्रविण नाडागुडे**

खेळाडूंना वैयक्तिक पारितोषिकांनी गौरविण्यात आले.

या स्पर्धेमुळे लातूर शहरातील क्रिकेटप्रेमींना उत्कंठावर्धक आणि ऊर्जा भरून टाकणारा क्रीडा सोहळा अनुभवायला मिळाला. तरुण खेळाडूंनी दाखवलेल्या कौशल्य, मैत्रीभाव आणि संघभावनेने स्पर्धेला वेगळीच उंची दिली.



# कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या पंप चालकांवर होणार कारवाई !

## प्रभारी जिल्हाधिकारी राहुल कुमार मीना यांनी घेतला आढावा

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही, काही पेट्रोल पंप चालकांकडून विनाकारण पंप बंद ठेवले जात असल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. ग्राहकांना इंधन नाकारून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा हा प्रकार सार्वजनिक हिताला बाधा आणणारा असून, याची गंभीर दखल घेत प्रभारी जिल्हाधिकारी राहुल कुमार मिना यांनी जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालकांसाठी नियमावली जाहीर केली आहे. त्यांनी जिल्ह्यातील पेट्रोलपंप धारकांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेवून याबाबत सूचना दिल्या आहेत.

यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांच्यासह पेट्रोलपंप चालक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पेट्रोलपंप चालकांनी साठा उपलब्ध असताना कोणत्याही परिस्थितीत विक्री बंद ठेवू नये. तसेच ग्राहकांना इंधन देण्यास कोणत्याही परिस्थितीत नकार देऊ नये. इंधनाची मर्यादित विक्री करणे किंवा कारणाशिवाय अडथळे निर्माण करणे टाळावे. शासनाने ठरवून दिलेल्या विहित वेळेत पंप नियमित सुरू ठेवावेत. पंपावर दर्शनी भागात इंधनाचे दर स्पष्टपणे दिसतील असे फलक लावावेत. स्टॉक आणि विक्रीची नोंद रोजच्या रोज अपडेट असावी आणि तपासणी अधिकाऱ्यांना सर्व नोंदवह्या उपलब्ध करून द्याव्यात. साठा लपविणे किंवा मुद्दाम टंचाई निर्माण करणे हे नियमांचे उल्लंघन मानले जाईल. पंपावर सीसीटीव्ही प्रणाली २४ तास कार्यरत असावी आणि त्याचे रेकॉर्ड प्रशासनास उपलब्ध करून द्यावे, अशा सूचना सर्व पेट्रोलपंप चालकांना यावेळी देण्यात आल्या.

**तालुकास्तरावर विशेष पथके स्थापन**

यानुसार अंमलबजावणीसाठी तालुकास्तरावर विशेष पथके गठीत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये पथक प्रमुख म्हणून संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकारी, सहायक पथक प्रमुख म्हणून संबंधित पुरवठा निरीक्षक किंवा सहायक महसूल अधिकारी आणि सदस्य म्हणून संबंधित पुरवठा विभागाचे लिपिक-टंकलेखक यांचा समावेश करण्यात आला आहे. ही पथके आपापल्या कार्यक्षेत्रातील पेट्रोल पंपांची अचानक तपासणी करतील.

तपासणी दरम्यान जर एखादा पेट्रोल पंप चालक दोषी आढळला, तर त्यांच्यावर केवळ आर्थिक दंडच नाही तर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये पेट्रोलियम नियम २००२, जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५, भारतीय नागरिक सुरक्षा २०२३ आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतुदींनुसार कडक कारवाई केली जाईल. या आदेशाची प्रत सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आली आहे. जिल्ह्यातील तेल कंपन्यांच्या सेल्स ऑफिसर्सनाही या मोहिमेत सहभागी करून घेण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा कार्यालयाकडून देण्यात आली.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये प्रवेशाची संधी

### २५ मे २०२६ पर्यंत सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि लातूर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असणे अनिवार्य असून, अर्जासोबत जातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा १ लाख रुपयांपर्यंत असावी आणि त्यासाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेला दाखला सादर करावा लागेल, तसेच विद्यार्थ्याचे पालक शासकीय किंवा निमशासकीय सेवेत नसावेत. या योजनेअंतर्गत आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना, तसेच विधवा, घटस्फोटित, निराधार आणि दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील पाल्यांना प्रवेशासाठी प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. अर्जासोबत पालकांचे संमतीपत्रक, विद्यार्थ्याचे आधार कार्ड, दोन पासपोर्ट साईज फोटो, जन्मतारखेचा पुरावा आणि वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. जर विद्यार्थी दारिद्र्य रेषेखालील असेल, तर संबंधित प्रमाणपत्राची प्रत आणि अनुक्रमांक नमूद करावा लागेल.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व निवासाचा संपूर्ण खर्च आदिवासी विकास विभागामार्फत केला जाणार आहे. प्रवेश अर्ज प्रकल्प कार्यालयात विनामूल्य उपलब्ध असून, परिपूर्ण भरलेले अर्ज २५ मे २०२६ पर्यंत जमा करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी पालकांनी 'प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, रिलायन्स मॉलच्या पाठीमागे, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर' येथील शिक्षण विभागात संपर्क साधावा, असे आवाहन प्रकल्प अधिकाऱ्यांनी केले आहे.

## मुरुड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा सुशोभीकरण कामाची धिरज देशमुख यांच्याकडून पाहणी



**मुरूड/प्रतिनिधी :** येथे उभारण्यात येत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा सुशोभीकरण कामाची जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी आज पाहणी केली. आमदार म्हणून कार्यरत असताना त्यांनी या महत्त्वपूर्ण कामास मंजुरी देत आवश्यक असलेला २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता.

मुरूडच्या मध्यवर्ती ठिकाणी साकारत असलेले हे स्मारक भविष्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा देणारे महत्त्वपूर्ण शक्तिस्थान ठरणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

पाहणीदरम्यान सुशोभीकरणाच्या कामामध्ये काही त्रुटी निदर्शनास आल्याने संबंधित अधिकारी व ठेकेदारांच्या निदर्शनास त्या बाबी आणून देत आवश्यक सूचना करण्यात आल्या. लाखो अनुयायांची आस्था आणि प्रेरणास्थान असलेल्या या ठिकाणाचे काम अत्यंत दर्जेदार, सुबक व उल्लेखनीय व्हावे, यासाठी सातत्याने पाठपुरावा राहणार असल्याचेही धिरज देशमुख यांनी नमूद केले.

यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख,पंचायत समिती सभापती श्रीकांत बैले, उपसभापती महेश चव्हाण, अनंत कणसे, डॉ.दिनेश नवगीरे, उध्दव सवासे, दिपक पटाडे, ईश्वरप्रसाद चांडक, रामानंद जाधव, समाधान गायकवाड,जनक गायकवाड, नितीन जाधव, राजेसाहेब सवई, अमोल देडे, दिपक काळे, सारिकाताई फेरे, राणीताई खोडसे, ऋषीकेश मुटकुळे, निलेश फेरे, मुकेश सवासे, संजय अंधारे,शरीफ सय्यद, विरसेन भोसले, उत्तम चव्हाण, प्रशांत पिंपरे, शाम ईटकर, गौतम लांडगे, सुरज कांबळे, अमोल गाडे, चैतन्य पटाडे, सुभाजी कुंभार आदी उपस्थित होते.

## लातूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबाबत आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सन २०१६ ते २०२० या वित्तीय वर्षात प्रवेशित अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम समाज कल्याण विभागाकडून मंजूर झाली आहे. परंतु, संबंधित प्रशिक्षणार्थ्यांचे बँक खाते क्रमांक, आयएफएससी कोड आणि मोबाईल क्रमांक उपलब्ध नसल्याने शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या खात्यावर जमा होऊ शकलेली नाही.

तरी सन २०१६ ते २०२० या कालावधीतील पात्र विद्यार्थ्यांनी आपले सध्या सुरू असलेले बँक खाते क्रमांक, आयएफएससी कोड, मोबाईल क्रमांक, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि ओळखीचा इतर पुरावा घेऊन २० मे २०२६ पर्यंत संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित राहावे व आपली शिष्यवृत्तीची रक्कम रोखा विभागाकडून प्राप्त करून घ्यावी. जे विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित राहू शकत नाहीत, त्यांनी आपले सर्व आवश्यक कागदपत्रे संस्थेच्या श्रीींîिळींळूरहे.लो या ईमेलवर पाठवावीत. विहित मुदतीत कागदपत्रे सादर न केल्यास शिष्यवृत्तीची रक्कम वाटप न करता ती शासनास जमा केली जाईल, असे लातूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य संजय माळकुंजे यांनी कळविले आहे.

## लातूर जिल्हा व सत्र न्यायालयात ९ मे रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर, दि. ०४ : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि सर्वोच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा व सत्र न्यायालय, तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये शनिवार, ९ मे २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या लोकअदालतीमध्ये प्रलंबित तडजोडीस पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे, नेगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट (कलम १३८) अंतर्गत धनादेश अनादर प्रकरणे, भूसंपादन, कौटुंबिक वाद आणि मोटार वाहन अपघात दावा प्रकरणे, दरखास्त प्रकरणे व कामगार/औद्योगिक न्यायालयातील प्रकरणे, बँकेशी संबंधित प्रलंबित प्रकरणे तसेच बँक तथा वित्तीय संस्थांची वाद पूर्व प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

लोकअदालतीमध्ये दोन्ही पक्षांना आपली बाजू मांडण्याची समान संधी मिळते. आपापसातील संमतीने तडजोड होत असल्याने दोन्ही पक्षांचा वेळ आणि पैसा वाचतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, प्रकरण आपापसातील संमतीने निकाली निघाल्यास भरलेले न्यायालयीन शुल्क परत मिळते. या लोकअदालतीमध्ये पक्षकार आणि विधीज्ञांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपली प्रकरणे तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष संजय भारुका तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. एन. गिरवलकर यांनी केले आहे.

## बंजारा भाषेचा शब्दकोष – एक अमूल्य ठेवा




**बळीराम रुपचंद जाधव लिखितगोरमाटी भास्या सब्दकोस प्रकाशन सोहळा येत्या ६ मे रोजी**

येत्या बुधवार, ६ मे, २०२६ रोजी दुपारी ४ वाजता वाडा बँक्वेट हॉल, छत्रपती संभाजी महाराज चौक, लातूर-औसा हायवे, लातूर येथे पोहरादेवी संस्थानचे धर्मगुरु शेखर महाराज हे कार्यक्रमाचे अध्यक्ष असणार आहेत. बळीराम रुपचंद जाधव लिखित गोरमाटी भास्या सब्दकोस पुस्तकाचा प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते पुस्तकाचे विमोचन होणार आहे. या कार्यक्रमास माजी प्राचार्य तथा ख्यातनाम साहित्यिक प्रा. डॉ. गणपत राठोड, सेवानिवृत्त तहसीलदार एल.टी. चव्हाण यांची प्रकाशन सोहळ्यास उपस्थिती राहणार आहे. या सब्दकोसाचे संपादक, लेखक बळीराम रुपचंद जाधव, संयोजन पुस्तक प्रकाशन समिती बंजारा समाज असणार आहेत.

**लातूर/प्रतिनिधी :** बळीराम जाधव गुरुजी लिखित गोरमाटी भाषेचा शब्दकोष प्रकाशन कार्यक्रम माननीय मंत्री महोदय संजय भाऊ राठोड यांच्या हस्ते होणार आहे. शब्दकोशाचे वापर येणाऱ्या पिढीला होणार आहे .

आधुनिक पिढी आपल्या भाषेपासून दूर जाताना दिसत आहे. याडी बोलीचे शब्द आपण विसरत आहोत. पुढील पिढीसाठी हा शब्दकोष अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. बंजारा, गोरमाटी भाषा ही आपल्या समृद्ध संस्कृतीची आणि परंपरेची जिवंत ओळख आहे.

या भाषेतील प्रत्येक शब्दामध्ये समाजाचा इतिहास, जीवनपद्धती आणि भावना दडलेल्या आहेत. अशा या मौल्यवान भाषेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी शब्दकोष तयार करणे हे अत्यंत महत्त्वाचे आणि कष्टसाध्य कार्य आहे.भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची, परंपरेची आणि ओळखीची जिवंत ओळख असते.

बंजारा / गोरमाटी समाजाची भाषा देखील अशाच समृद्ध परंपरेची साक्ष देते. या भाषेतील शब्द, वाक्प्रचार, म्हणी यांचा संग्रह म्हणजे समाजाच्या इतिहासाचा आणि जीवनशैलीचा आरसा होय. अशा या मौल्यवान भाषेचे जतन करण्यासाठी तुम्ही शब्दकोष तयार केलात हे अत्यंत महत्त्वाचे आणि कष्टसाध्य कार्य आहे. एखादे पर्वत उचलण्यासारखं काम आहे आणि हे बळीराम जाधव गुरुजी तुम्ही करून दाखवलात त्याबदल तुमचं हार्दिक अभिनंदन. गोरमाटी भाषेसाठी तुमचा हा शब्दसंग्रह मैलाचा दगड ठरू शकतो .

जाधव यांच्या बंजारा भाषेचा तब्बल ४५ हजार शब्दांचा शब्दकोष तयार करून एक उल्लेखनीय आणि अभिमानास्पद कार्य केले आहे. मला वाटते हा शब्दकोष केवळ शब्दांचा संग्रह नसून, तो बंजारा समाजाच्या सांस्कृतिक वारशाचा अमूल्य ठेवा आहे.तो बंजारा संस्कृतीचा खजिना आहे. पुढील पिढ्यांसाठी हा एक दीपस्तंभ ठरेल, जो त्यांना त्यांच्या मूळाशी जोडून ठेवेल.

या कार्यामुळे बंजारा, गोरमाटी भाषा अधिक सुसंगत, अभ्यासनीय आणि पुढील पिढ्यांसाठी उपलब्ध झाली आहे. तुमच्या या परिश्रमांमुळे भाषा जतन होण्यास मदत होईल, तसेच संशोधक, विद्यार्थी आणि समाजातील सर्व घटकांना याचा मोठा फायदा होईल. ही कृती नक्कीच प्रेरणादायी असून समाजासाठी एक आदर्श निर्माण करणारी आहे.

# विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे दि. ६ ते ८ मे पर्यंत पुण्यात आयोजन

## कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलच्या स्पर्धेसाठी ४१ संघ सहभागी होणार

**पुणे-मुंबई/प्रतिनिधी:** अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलच्या क्रीडास्पर्धेचे आयोजन बुधवार (दि. ६) ते शुक्रवारपर्यंत (दि. ८) बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलामध्ये करण्यात आले आहे. या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये १० राज्यांतील विविध विद्युत कंपन्यांचे पुरुष व महिला गटातील तब्बल ४१ संघ सहभागी होत आहेत.

या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रासह गुजरात, हरियाणा, तेलंगाणा, राजस्थान, उत्तराखंड, पंजाब, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, दिल्ली आदी राज्यांतील सरकारी व खासगी विद्युत कंपन्यांचे ४१ संघ आणि सुमारे ५३८ महिला व पुरुष खेळाडू सहभागी होत आहेत. कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलमध्ये पुरुष संघात लढत होईल तर कबड्डी व खो-खोमध्ये महिला संघांचा समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्पर्धेतील अजिंक्यपदासाठी कबड्डीमध्ये पुरुष व महिला गटातील १८ संघ तर खो-खोसाठी ९ संघ सहभागी होत आहेत. तसेच कुस्ती व बास्केटबॉलमध्ये अजिंक्यपदासाठी पुरुष गटामध्ये प्रत्येकी ७ संघांमध्ये लढत होणार आहे.

विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन बुधवारी (दि. ६) सकाळी ९.३० वाजता राज्याच्या ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्या मुख्य उपस्थितीत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्याहस्ते होणार आहे. यावेळी राज्याच्या क्रीडा आयुक्त सौ. शीतल तेली-उगले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. तसेच महावितरण, महानिर्मीती, महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळासह अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री. जिग्नेश राय, सरचिटणीस श्री. नरेश कुमार यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. तर शुक्रवारी (दि. ८) सायंकाळी ५ वाजता अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीवकुमार (महापारेषण) व श्री. राधाकृष्णन बी. (महानिर्मिती) यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षिस वितरणाचा कार्यक्रम होईल.

महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनात या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष म्हणून पुणे प्रादेशिक संचालक श्री. सुनील काकडे तसेच उपाध्यक्ष म्हणून मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप (महापारेषण) व अधीक्षक अभियंता श्री. अशोक घाडगे (महानिर्मिती) आणि मुख्य समन्वयक म्हणून मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके (महावितरण) व श्री. पुरुषोत्तम वारजुरकर (महानिर्मिती) आणि विविध समितीचे प्रमुख व सदस्य कार्यरत आहेत.

## लातूर क्रेडाईच्यावतीने १ मे सामाजीक उपक्रमांनी साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर क्रेडाईच्या वतीने आयोजीत १ मे २०२६ ध्वजारोहन व कामगारांच्या सत्कार व बांधकाम मजुरांप्रती कृतज्ञता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम दिशा फाऊंडेशन व क्रेडाई लातूर यांच्या वतीने आयोजीत करण्यात आला होता. दिशा फाऊंडेशनचे तज्ञ प्रवीण पाटील व डॉ. प्रदीप नागुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

लातूर क्रेडाईचे अध्यक्ष उदय पाटील, सचिव विष्णू मदने, राष्ट्रीय क्रेडाईचे सदस्य डॉ. धर्मवीर भारती, चेअरमन जगदीश कुलकर्णी, माजी अध्यक्ष सुबोध बेळंबे, क्रेडाईचे भावी अध्यक्ष संतोष हत्ते, डी. बी. रिॲलिटीचे संचालक बंकट भांगडीया, दुर्गेश ब्रिजवासी, कार्यक्रमाचे प्रोजेक्ट चेअरमन नागनाथ गिते, आकाश कोटलवार, प्रशांत रेड्डी व लातूर क्रेडाईचे सर्व ओबी टीम उपस्थित होती.

महाराष्ट्र दिन हा कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. त्या दृष्टीने लातूर क्रेडाईने सामाजीक उपक्रम म्हणून बांधकाम मजुरांप्रती कृतज्ञता सप्ताह व मोफत आरोग्य तपासणी शिबीराचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी लातूर जिल्ह्यातील बांधकाम मजुरांना स्कील डेव्हलपमेंटचे ट्रेनिंग देण्यात आले. लातूर क्रेडाईच्या वतीने महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून केलेल्या उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या उपक्रमासाठी लातूर क्रेडाईचे संपूर्ण पदाधिकारी व ओबी मेंबर उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तत्पर कार्यवाही करावी

## माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या आढावा बैठकीत सूचना

**लातूर/प्रतिनिधी :**उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असून मे महिन्यातही तापमान मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. परिणामी निलंगा मतदारसंघात पाणीटंचाई उद्भवण्याची शक्यता असून मतदारसंघातील एकाही गावाला पाणी टंचाई भासणार नाही याची खबरदारी घेवून पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तत्पर कार्यवाही करावी, अशी सूचना माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली आहे.



लातूर येथील शासकीय विश्रामगृहात माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाजयांच्या उपस्थितीत पाणी टंचाई आढवा बैठक घेतली. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील, निलंगा तहसिलदार प्रसाद कुलकर्णी, शिरुर अनंतपाळ तहसिलदार किशोर यादव, देवणी तहसिलदार सोमनाथ वाडकर यांच्यासह शिरुर अनंतपाळ पंचायत समितीचे सभापती संजय सूर्यवंशी, निलंगा पंचायत समिती सभापती सुनिता वाघमारे, देवणी पंचायत समिती सभापती अंकिता पाटील, निलंगा नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, शिरुर अनंतपाळ नगराध्यक्ष रतन शिवणे आदींसह प्रशासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधींची उपस्थिती होती.

लातूर जिल्हा पाणीटंचाईग्रस्त म्हणून ओळखला जात असला तरी पाणीटंचाईचा हा काळा पुसण्याचा प्रामाणिक प्रयत्न सातत्याने महायुती सरकारकडून होत असल्याचे सांगून माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी निलंगा विधानसभा मतदार संघात पाणीटंचाई फारशी जाणवत नसल्याचे स्पष्ट केले. यापूर्वी निलंगा मतदारसंघात सिंचनाचे व पाणीपुरवठ्याचे काम अतिशय नियोजनबध्द केले असल्यामुळेच हे शक्य झाले असल्याचे सांगितले. मात्र सध्या तापमान मोठ्या प्रमाणात वाढत असून मे महिन्यातही तापमानाचा पारा वाढण्याची शक्यता हवामन खात्याने वर्तविली आहे.त्यामुळे मतदारसंघात पाणीटंचाई उद्भवणार नाही यासाठी प्रशासनाने तात्काळ ठोस पाऊले उचलून नियोजन आराखडा तयार करावा, अशी सूचना देत मतदारसंघातील प्रत्येक गावात सध्या पाण्याची परिस्थिती काय आहे याबाबत माहिती घेवून ज्या ठिकाणी पाणीटंचाई उद्भावणार आहे तेथे कोणत्या उपाययोजना करणे अपेक्षित आहे त्या पूर्ण करून घ्याव्यात, अशाही सूचना आ. निलंगेकर यांनी दिल्या.

प्रत्येक गावातील तलाठी, आणि ग्रामसेवक यांनी वेळोवेळी आढावा घेवून पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाजयाचीही गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच याबाबत प्रशासनास वेळोवेळी माहिती द्यावी, असे सांगून माजी मंत्री आ. निलंगेकर म्हणाले की, या माहितीच्या आधारे प्रशासनाने गांभीर्याने कार्यवाही करावी अशी सूचना केली. त्याच बरोबर नागरिकांकडून येणाजया पाणीटंचाईसह इतर तक्रारींची वेळीच दखल घेवून त्याबाबत तत्काळ उपाययोजना व्हाव्यात असेही माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी सूचित केले.

बैठकीच्या सुरुवातीस तिन्ही तालुक्याच्या तहसिलदारांनी आपापल्या तालुक्यातील पाणीसाठा व संभाव्य पाणीटंचाईबाबत करण्यात येत असलेल्या उपाय योजनांची माहिती दिली. यावेळी निलंगा बाजार समितीचे सभापती शिवकुमार चिंचनसुरे, देवणी बाजार समितीचे सभापती सदाशिव पाटील, शिरुर अनंतपाळ बाजार समितीचे सभापती गोविंद चिलकुरे, निलंग्याचे माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, मंगेश पाटील, निलंगा तालुकाध्यक्ष कुमोद लोभे,देवणी तालुकाध्यक्ष शिवराज बिरादार, शिरुर अनंतपाळ तालुकाध्यक्ष माधव बिरादार, माजी जि.प. सदस्य डॉ. संतोष वाघमारे,प्रशांत पाटील, संभाजी पाटील तळेगावकर, नागेश जिवणे, गणेश धुमाळे आदींची उपस्थिती होती.

## डॉ. अशोक आरदवाड यांना मातृशोक



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील सुप्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. अशोक आरदवाड यांच्या मातोश्री श्रीमती चंद्रकलाबाई गोविंदराव आरदवाड यांचे सोमवार दिनांक ४ मे २०२६ रोजी वृध्दपकाळाने दुख:द निधन झाले आहे.

त्यांच्या पश्च्यात एक मुलगा डॉ.अशोक आरदवाड, एक मुलगी सौ.मीना सुडे तसेच सून, जावई, नातवंडे असा मोठा परीवार आहे. त्यांच्या पार्थिवावर उद्या दिनांक ५ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता लातूर येथील मारवाडी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

oooooooooooooooooooooooooooooooooooooo

## अहमदपूरमध्ये पेट्रोल-डिझेल साठी रांगा

**अहमदपूर/ प्रतिनिधी:** शहरासह परिसरातील सर्व सात पेट्रोल पंपांवर गेल्या दोन ते तीन दिवसांपासून पेट्रोल आणि डिझेलचा तीव्र तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे वेळेवर इंधन न मिळाल्याने वाहनधारकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. ज्या पेट्रोल पंपावर पेट्रोल-डिझेल उपलब्ध आहे तेथे वाहनाच्या लांबच लांब रांगा लागलेल्या पहावयास मिळत आहेत.

या सर्व पंपांवर मागील ८ दिवसांपासून अधूनमधून इंधनाची कमतरता भासत आहे. इंधन मिळेल या आशेने नागरिक आपली दुचाकी, तीनचाकी आणि चारचाकी वाहने पंपावर उभी करून तासन्तास प्रतीक्षा करीत आहेत. मात्र, कंपन्याकडून वेळेत पुरवठा न झाल्याने अनेकांना वाहनांसह थांबून उभे राहावे लागत आहे. सोलापूर येथील डेपोमधून इंधनाचा पुरवठा वेळेवर न झाल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. हिंदुस्थान पेट्रोलिअम, भारत पेट्रोलिअम, आणि इंडियन ऑईल यांच्या ऑईल डेपोंमधून पेट्रोल, डिझेल पुरविले जाते. या ऑईल डेपोंमधूनच या पेट्रोल पंपांना पुरेसे पेट्रोल, डिझेल दिले जात नसल्याचे समोर येत आहे. कंपन्यांना या पेट्रोल पंपांनी आगाऊ पैसे भरून, चलन घेऊनही त्यांचे टँकर भरले जात नाहीत. यामुळे पेट्रोल पंप ड्राय पडत आहेत. २६ मार्च रोजी दुपारनंतर तर सर्व पंपांवर इंधन पूर्णपणे संपल्याच्या अफवेने मोठी गर्दी झाली होती. सायंकाळी सुप्रसिद्ध तात्या पेट्रोल पंपावर इंधन उपलब्ध होताच वाहनधारकांनी तेथे रात्रभर लांबच लांब रांगा लावल्या होत्या.



## उन्हाळ्यात माठाला मागणी, दरात ५० ते १०० रुपयांनी वाढ

निलंगा/प्रतिनिधी : उ उन्हाची तीव्रता वाढल्याने गरिबीचा फ्रिज असलेल्या मातीच्या माठांना मागणी वाढत आहे. दरम्यान, माठ तयार करून बाजारापर्यंत आणण्यासाठी लागणारा कच्चा माला आणि वाहतुक खर्चात वाढ झाल्यामुळे माठाच्या किंमतीही वाढल्या असून मागील वर्षापेक्षा सरासरी ५० ते १०० रुपयांनी माठाच्या आकारानुसार किमती वाढल्या आहेत. उन्हाळ्याची चाहूल लागताच प्रत्येकाला थंड पाण्याची गरज भासू लागली आहे. दरम्यान, सर्वसामान्य आणि गरिबांचा फ्रिज म्हणून ओळखला जाणारे माठ निलंगा तालुक्यातील मोठी बाजारपेठेत असलेल्या कासारशिरसी बाजारपेठेत दाखल झाले आहेत. माठ घडवणाऱ्या कारागिरांनी सांगितले की, माठ बनवण्यासाठी लालसर माती लागते. अगोदर माती आणून त्याला व्यवस्थित बारीक करावी लागते व त्याला परत पाण्यात भिजू घालावे लागते. त्यानंतर मातीला पाण्यातून बाहेर काढून व्यवस्थितपणे तुडवून व्यवस्थित आकार द्यावा लागतो. आकार दिल्यानंतर दोन दिवस पूर्णपणे उन्हात ठेवावे लागते. त्यानंतर आगीच्या भट्टीत व्यवस्थित भाजून काढावे लागते. त्यानंतर पक्के माठ तयार होवून नागरिकांसाठी विक्रीसाठी बाजारपेठेत न्यावे लागतात. दरम्यान, गतवर्षीच्या तुलनेत यंदा माठाच्या किंमती वाढल्या आहेत. गतवर्षी एक माठ बनवण्यासाठी सरासरी १५०ते १९० रुपये खर्च लागत होते. तोच खर्च यंदा माती आणण्यापासून ते बाजारात विक्री करेपर्यंत एका माठाला २०० रुपये पर्यंत खर्च येत आहेत. त्यामुळे गतवर्षी २५० रुपयांपर्यंत येणार माठ यंदा ३०० ते ३५०० रूपये प्रति नग विक्री केला जात आहे.

## लातूर येथील अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या कामगार मेळाव्यात कामगारांच्या प्रश्नावर मंथन

### कामगार हिताचे कायदे रद्द करून कामगारांची मुस्कटदाबी केली जातेय : हनुमंत पवार

**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि नारायण मेघाजी लोखंडे यांच्या परिश्रमातून कामगारांच्या हिताचे झालेले कायदे आजचे भाजपचे केंद्र आणि राज्यातील सरकार कामगार कायदे रद्द करून कामगारांना गुलाम करून त्यांची मुस्कटदाबी करत आहे. त्याविरोधात कामगारांनी पेटून उठण्याची गरज आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र काँग्रेचे प्रवक्ते हनुमंत पवार यांनी लातूर येथे केले.

लातूर येथे अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या ३ मे रोजी दगडोजीराव देशमुख सभागृहात आयोजित जिल्हा कामगार मेळाव्यात ते बोलत होते. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मंगलताई शिंदे या होत्या. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मोदी सरकारची धोरणे न पटल्याने राजीनामा देऊन रस्त्यावरच्या लढाईत उतरलेले केरळचे सनदी अधिकारी कन्नन गोपीनाथ नायर, असंघटीत कामगार कर्मचारी काँग्रेसचे अध्यक्ष तथा पुणे मनपाचे नगरसेवक सुनील शिंदे, अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर, भटक्या विमुक्ताचे नेते प्रा. सुधीर अनवले, नूतन अंगरखे,महाराष्ट्र विकास आघाडीचे बसवंत उबाळे, इंजि. शेख शफी, शिवाजी भंडारे, सुरेश काटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

हनुमंत पवार पुढे म्हणाले, केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणविरुद शेतकऱ्यांनी बोलायचे नाही, कामगारांनी बोलायचं नाही,



विद्यार्थ्यांनी बोलायचे नाही, अशा परिस्थितीत तुम्ही कामगार मेळावा घेऊन बोलत आहात. त्यामुळे मी केव्हाही छातीचा कोट करून तुमच्या सोबत असेल. तर देशही जनता आहे. पण काही उद्योगपती, सरकार म्हणजे देश समजला जातोय. जनता म्हणजे आपली प्रगती झाली तर देशाची प्रगती होईल. सध्या दोन विचारधारांची लढाई आहे. देशाच्या प्रगतीच्या विरोधात केंद्र सरकार व्हीलन आहे. असे मत कन्नन गोपीनाथन यांनी व्यक्त केले. तसेच सुनील शिंदे यांनी कामगारांना सविस्तर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, केंद्र सरकारने कामगारांचे २९ कायदे रद्द करून चार काळे कायदे केले. ते एकतर्फी केले आहेत. कामगार संघटनाना विचारात घेतलेले नाही. या कायद्याच्या विरोधात आपण मूग गिळून बसतो. आपणच आपल्यासाठी घातक आहोत. हे आपण समजून घेतले पाहिजे. राजकुमार होळीकर यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. आणि राजकुमार होळीकर यांनी आपल्या प्रस्ताविकात कामगार कायदे, आजची आव्हाने याबद्दल सविस्तर सांगितले. ते म्हणाले, सरकारने नवीन केलेल्या चार लेबर कोड मध्ये कामाचे तास आठ वरून पुन्हा बारा करण्यात आलेले आहेत. आणि इतर नुकसानदायी बाबी आहे. असा उलट्या दिशेने प्रवास सुरु आहे. मोदी सरकारच्या विरोधात बोलणे सरकारने अवघड करून ठेवले आहे. जन सुरक्षा कायद्याच्या माध्यमातून मोर्चा, आंदोलने करणाऱ्यांना अटकाव घातला आहे. भारतीय कामगार परिषद रद्द केली आहे. त्यामुळे या व्यवस्थेविरोधात तमाम कामगारांनी संघटित होण्याची गरज आहे. गत निवडणुकीत भाजपला मतदान करू नका अशी भूमिका आम्ही घेतली होती. यावेळी उत्कृष्ठ कार्यकर्ता म्हणून अण्णाराव सूर्यवंशी यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.तर महेंद्र कांबळे यांनी सर्व मान्यवरांना 'शिवाजी कोण होता 'हे पुस्तक भेट दिले. मेळाव्याचे उत्कृष्ठ असे सूत्रसंचालन ॲड. शिरीष दहिवाल यांनी केले. मेळाव्यासाठी प्रमोद बनाटे, किशोर सगर, भागवत पांचाळ, नेताजी बनसोडे, बळीराम कांबळे, राजाभाऊ वटनुरे, अंजली येदले, अंजनाताई सगट, अंकुश टकळगे, रेणुकाताई कांबळे, सुषमाताई मिटकरी, राजकुमार भंडे, सुधीर कांबळे, लहू जगताप, पंडित गायकवाड, गौतम ससाणे, सिकंदर लोखंडे, परमेश्वर कांबळे, रांनी लोढा, प्रल्हाद कलवले आदिनी परिश्रम घेतले.

## अभिनंदन ..

असो विजेता कुणी
कर खुले शुभचिंतन
शब्द दोन चार पुरेसे
सफल अभिष्टचिंतन

दिसे मोठेपणआपले
मुक्त मुखे अभिनंदन
कष्ट कितीसे लागती
कर जोडून कर वंदन

दुःखव्यक्त एकांतात
खुशाल करारे रूदन
सर्वां समोर रे निदान
नकोमुळी अधोवदन

का हार पदरी पडली
निवांत करासंशोधन
आपल्याप्रमादावरती
नकोखोटे आच्छादन

निर्णय मान्यतानसता
सकारण द्या आवेदन
विरोध नक्की करावा
पुराव्यांसहीतनिवेदन

अवेळी रे शोक सभा
विफलठरते आक्रंदन
योग्य असूनहीआपले
मातू लागेल रणक्रंदन

सबुरीने मांडा म्हणणे
मिळे शक्त अनुमोदन
आकांडतांडव नसावा
विफल आरण्य रूदन

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

रोज वाचा
ऑनलाईन
लातूर समाचार
www.
latursamachar.
com

## सरस्वती कनिष्ठ महाविद्यालयाचे बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश



लातूर – येथील सरस्वती संगीत कला कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी याही वर्षी बारावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये महाविद्यालयाच्या यशाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. बारावी बोर्ड परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम शितल नारायणराव दांडगे, द्वितीय क्रमांक माहेश्वरी अंकुशराव साळुंखे आणि राजेश केशव गायकवाड व कु.सानिया अल्लाउद्दीन शेख यांनी तृतीय क्रमांक पटकावला असून या सर्व गुणवंतांचा संस्थेचे संस्थाअध्यक्ष तालमणी डॉ. राम बोरगावकर सर यांच्या हस्ते सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग गोरे, प्रा. तुकाराम येमले, प्रा.सलील शहाजींदे, प्रा. डॉ. सुदाम पवार, प्रा. श्रीमंत दोरवे यांचेसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## जय भारत उच्च माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम



**निलंगा/अयुब बागवान :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या बारावीच्या निकालात दापका येथील जय भारत उच्च माध्यमिक विद्यालयाने घवघवीत यश संपादन करून आपली यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९३.३६% लागला असून, विज्ञान, कला आणि वाणिज्य तिन्ही शाखांमधील विद्यार्थ्यांनी यशाचे परंपरा कायम राखली असून एकूण ९६६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यापैकी ९०१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

**शाखानिहाय निकालाचा तपशील:**

विज्ञान शाखा: विज्ञान शाखेतून एकूण ५९१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यापैकी ५८३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या शाखेचा निकाल ९८.६४% लागला आहे. यामध्ये १०३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून, २७२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर द्वितीय श्रेणीत २०५ उत्तीर्ण झाले आहेत.

* प्रथम: पोतदार ऋतुजा संतोष (९०.५०%)
* द्वितीय: वंटे संध्याराणी विजयकुमार (८८.६७%)
* तृतीय: कुलकर्णी श्रीवत्स प्रसन्ना (८८.५०%)

**कला शाखा:** कला शाखेचा निकाल ८४.५७ % लागला आहे. २०१ विद्यार्थ्यांपैकी १७० विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

* प्रथम: सय्यद दिलशाद अब्दुलरहीम (८६.१७%)
* द्वितीय: खलंग्रे समीक्षा दयाराम (७७.५०%)
* तृतीय: सय्यद इशरत इस्माईल (७७.१७%)

**वाणिज्य शाखा:** वाणिज्य शाखेचा निकाल ८५.५४ % लागला असून १७३ पैकी १४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

* प्रथम: जाधव रोहिणी गोरख (८५.००%)
* द्वितीय : दाडगे जागृती संतोष (८४.००%)
* तृतीय: मिरकले क्षितिजा भागवत (७९.००%)

मान्यवरांकडून कौतुक:

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष वसंतराव पाटील, प्राचार्य डॉ. राजेश्वर पाटील, उपप्राचार्य नारायण मासाने आणि पर्यवेक्षक मनोज डिग्रसे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाला आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला हे यश समर्पित असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६